दैनिक
जनप्रभात
सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज

■(आष्टी) वर्धा ■ मंगळवार, दि.१६ जानेवारी २०२४ ■ वर्ष २ रे ■ अंक १९० ■ पृष्ठ ४ ■ मुल्य ५.०० ■ मुख्यसंपादक : राहुल गजरे ■ कार्यकारी संपादक : अवधूत शेंद्रे RNI NO : MAHAR/2020/82242

लिंबूवर्गीय फळपिकांसाठीच्या तीन सिट्रस इस्टेटसाठी ७ कोटींचा निधी

मुंबई : जिल्हा मध्यवर्ती रोपवाटिका उमरखेड, अमरावती, सिट्रस इस्टेट, धिवरवाडी, नागपूर, सिट्रर्स इस्टेट तळेगाव, वर्धा येथील शासकीय तालुका फळरोपवाटिकांमध्ये लिंबूवर्गीय फळपिकांकरिता सिट्रस इस्टेट स्थापन करण्यात आली आहे. या सिट्रस इस्टेटसाठी ७ कोटी २४ लाख ६७ हजार रुपयांच्या निधीस मंजूरी देण्यात आली आहे.सिट्रस इस्टेटसाठीच्या या निधीचे वितरण पुढील प्रमाणे होणार आहे. उच्चतंत्रज्ञान आधारीत रोपवाटीका स्थापन करण्यासाठी ३५ लाख ६५ हजार रुपये, त्यापैकी ६ लाख १५ हजार रुपये धिवरवाडी ता.काटोल, जि. नागपूरसाठी तर २९ लाख ५० हजार रुपये तळेगाव ता. आष्टी. जि. वर्धासाठी वितरित करण्यात येणार आहे. उमरखेड, ता. मोर्शी, जि. अमरावती येथील सिट्रस इस्टेटसाठी प्रशासकीय इमारत बांधकाम, कार्यालय, प्रयोगशाळा, प्रशिक्षण भवन, निविष्ठा विक्री केंद्र इत्यादीसाठी १ कोटी, तिन्ही सिट्रस इस्टेटमध्ये अवजारे बँक स्थापनेसाठी २ कोटी १४ लाख, माती, पाणी, उती व पाने चाचणी प्रयोगशाळा आणि जिवाणू खते उत्पादनासाठी लागणाऱ्या साहित्यासाठी ३ कोटी ६० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

पर्यटनातून रोजगार निर्मितीला चालना देणार:उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

नागपूर ■ दिलीप येवले







नागपूर जिल्ह्याला २५०कोटी तर भंडारा जिल्ह्याला १०० कोटी निधी;अंभोरा येथे वैनगंगा नदीवरील केबल-स्टेड पुलाचे लोकार्पण;विदर्भातील जल पर्यटनाला नवी दिशा मिळणार;अंभोरा केबल-स्टेड पुल म्हणजे 'स्टेट ऑफ आर्ट'

पर्यटनातून रोजगार निर्मितीला चालना देण्यासाठी ३५० कोटीचा विशेष विकास आराखडा तयार करण्यात आला आहे, याअंतर्गत भंडारा जिल्ह्याला १०० कोटी तर नागपूर जिल्ह्याला २५० कोटी निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. विदर्भात पर्यटनाचे सर्किट तयार करून वनपर्यटनासोबतच जल पर्यटन क्षेत्राचा विकास तसेच पर्यटकांसाठी विविध सुविधा निर्माण करण्यात येत असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

नागपूर-भंडारा जिल्ह्याच्या सिमेवर असलेल्या अंभोरा येथे वैनगंगा नदीवरील केबल-स्टेड पुलाचे लोकार्पण व भंडारा जिल्ह्यातील पहेला-अंभोरा सिमेंट काँक्रीट रस्त्याचे भूमिपूजन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. त्याप्रसंगी श्री फडणवीस बोलत होते.

खासदार सर्वश्री कृपाल तुमाने, सुनील मेंढे, भंडारा जिल्हा परिषद अध्यक्ष गंगाधर जीभकाटे, जिल्हाधिकारी डॉ.विपीन इटनकर, भंडाराचे जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, आमदार राजू पारवे यावेळी उपस्थित होते.

अंभोरा पुलाच्या मध्यवर्ती भागातून परिसरातील नैसर्गिक सौंदर्य, पाच नद्यांचा संगम आणि वनक्षेत्र पाहण्यासाठी प्रेक्षक गॅलरी बांधण्यात आली आहे. प्रेक्षक गॅलरी हे या पुलाचे वैशिष्ट आहे. यामुळे पर्यटकांना सुविधा झाली आहे. पर्यटन हा सर्वाधिक रोजगार निर्माण करणारा उद्योग असल्यामुळे आंभोरा परिसरात जल पर्यटन विकासाचे काम करण्यात येणार आहे. यातून विदर्भातील जल पर्यटनाला नवी दिशा मिळून बोटिंग, वॉटर स्पोर्ट्स, पाण्यातले साहसी खेळ, हॉटेल व्यवस्था आदी उद्योगातून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण होणार असल्याचे सांगताना श्री फडणवीस म्हणाले की, या प्रकल्पात स्थानिकांना प्राधान्य देण्यात येणार आहे.

वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प राबविण्यात येणार असून गोसेखुर्द प्रकल्पाचे वाहून जाणारे पाणी सहाशे किलोमीटर कॅनल द्वारे नागपूर-वर्धा-यवतमाळ, अमरावती, अकोला, बुलढाणा व वाशिम जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पोहोचवून संपूर्ण विदर्भात सिंचनाचे जाळे तयार करण्यात येणार आहे. गोसेखुर्द प्रकल्पग्रस्तां च्या संदर्भात विशेष बैठक घेण्यात येणार असल्याचेही उपमुख्यमंत्री श्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

केंद्रीय मंत्री नितीन गडगरी यावेळी म्हणाले की अंभोरा केबल-स्टेड पुल म्हणजे 'स्टेट ऑफ आर्ट' प्रकल्पाचे उत्तम उदाहरण असून नवीन तंत्रज्ञान, कल्पना आणि वैशिष्ट्यांचा समावेश असलेला हा अत्याधूनिक पूल आहे. याठिकाणी नागपूरच्या फुटाळा-शो प्रमाणे लाईट व साऊंड शो लवकरच सुरू करण्यात येणार आहे यात अे.आर. रहेमान यांचे संगीत घेतले आहे. हा पूल व शो बघण्यासाठी जगातील पर्यटक येथे येतील. अंभोरा परिसरात पर्यटनातून रोजगार उपलब्ध होण्याची सुरूवात या पुलामुळे झाली असल्याचे ते म्हणाले. पूर्वी या भागातील लोकांना भंडारा जाण्यासाठी ६० किलोमीटरचा फेरा पडत होता आता पुलामुळे भंडाऱ्याचे अंतर केवळ २० किलोमीटरवर आले आहे. या पुलामुळे येथील वाहतुकीची समस्या सुटेल व दळणवळणाचा खर्च देखील कमी होईल. गोसेखुर्द जल पर्यटनाचा जागतिक दर्जानुसार विकास करण्यात येईल पर्यटनातून येथील स्थानीकांना मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होईल असेही श्री गडकरी यांनी सांगितले.

यावेळी खासदार सुनिल मेंढे, आमदार राजू परवे यांनीही मनोगत व्यक्त केले. सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता दिनेश नंदनवार यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. एकमेव केबल स्टेड पूल असलेल्या अंभोरा पुलाची लांबी ७०५.२० मीटर असून या प्रकल्पाचे एकूण किंमत १७८ कोटी रुपये इतकी आहे. पुलाच्या मध्यभागी ४० मीटर उंचीवर प्रेक्षक गॅलरी उभारण्यात आली यात एकावेळी दिडशे लोक बसू शकतात, अशी व्यवस्था असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच भंडारा जिल्ह्यातील पहेला-अंभोरा हा रस्ता ७.६० किलोमीटर लांबीचा असून या प्रकल्पासाठी २४.९० कोटीची मान्यता मिळाली असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाला नागपूर व भंडारा जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी, शासकीय यंत्रणेचे पदाधिकारी व अधिकारी तसेच परिसरातील नागरिक उपस्थित होते.

वंचित आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी पीएम जनमन अभियान- खा.रामदास तडस

वर्धा ■ प्रतिनिधी

पीएम जनमन अभियानातील लाभार्थ्यांशी थेट संवाद;कार्यक्रम लाभार्थ्यांना प्रमाणपत्राचे वितरण



पीएम जनमन अर्थात प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान गेल्या १५ नोव्हेंबर पासून देशभर राबविण्यात येत आहे. या अभियानातून आदिवासी कोलाम समाजाच्या लाभार्थ्यांना ११ मुलभूत सुविधाच्या योजना राबविण्यात येत आहे. योजनांचा आदिवासी कोलाम समाजांनी अभियानातून लाभ घेऊन इतर लाभार्थ्यांना लाभ घेण्यास प्रवृत्त करावे, असे आवाहन खा. रामदास तडस यांनी केले

आर्वी तालुक्यातील रोहणा येथे पीएम जनमन अभियानातील लाभ देण्यात आलेल्या लाभार्थ्यांशी प्रधानमंत्री यांच्या थेट संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाला आ.दादाराव केचे, आदिवासी विकास विभाग नागपूरचे अप्पर आयुक्त रविंद्र ठाकरे, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी विश्वास सिद, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विशेष कार्य अधिकारी सुमित वानखडे, उपविभागीय अधिकारी विश्वास सिरसाट, गटविकास अधिकारी सुनिता मरस्कोल्हे, आदिवासी विकास विभागाचे प्रकल्प अधिकारी दिपक हेडाऊ, माजी सभापती निता गजाम, रोहना ग्रामपंचायतच्या सरपंच तृप्ती पावडे, शोभा काळे आदी उपस्थित होते.

जनमन अभियानांतर्गत केंद्र शासनाने आदिवासी समाजाच्या कल्याणासाठी त्यांना पक्के घरे, आदिवासी वस्तीतील रस्त्यांची कामे, स्वच्छ पिण्याचे पाणी, आरोग्य सुविधा, विद्युतीकरण, आदिवासी समाजाला व्यावसायिक प्रशिक्षण व कौशल्य विकास, वनधन विकासाची स्थापना, अंगणवाडी केंद्र आदी सुविधा निर्माण करुन देण्यात येत आहे. यासाठी अर्थसंकल्पात २४ हजार कोटीचा निधी मंजूर करण्यात आला आहे. यातून आदिवासींचे जिवनमान उंचावण्यास मदत होईल, असे खा. रामदास तडस म्हणाले.

अभियानांतर्गत जिल्ह्यात ४ लाख आयुष्यमान कार्डचे वितरण करण्यात आले असून या कार्डमुळे नागरिकांना ५ लाख रुपयांपर्यंत आरोग्य विम्याचे कवच मिळणार असल्याचेही ते पुढे बोलतांना म्हणाले. पीएमन जनमन अभियान आदिवासी समाजाला दिशा देणारे अभियान असून अभियानातून शेवटच्या घटकातील आदिवासींचा वैयक्तिक तसेच समाजाच्या वस्तींचा विकास होण्यास मदत होईल. योजनांच्या लाभाची रक्कम थेट खात्यात जमा होत असल्याने आ.दादाराव केचे म्हणाले.

आदिवासी समाजासाठी राबविण्यात येत असलेल्या विविध योजनेसोबतच विद्यार्थ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी शिष्यवृत्ती योजना, करीअर मार्गदर्शन प्रशिक्षण योजना आदी योजना राबविण्यात येत आहे. या योजनांचा आदिवासी विद्यार्थ्यांनी घ्यावा, त्याचबरोबर जिल्ह्यात रेशीम शेतीला पोषक वातावरण असल्याने शेतक-यांनी पारंपारिक शेती बरोबर रेशीम शेती व्यवसाय करावा असे रविंद्र ठाकरे म्हणाले.

या जनमन अभियानासाठी देशातील १८ राज्यातील २०० जिल्ह्यातील २२ हजार गावातील ७५ आदिम जमातीच्या विकासासाठी योजना राबविण्यात येत आहे. महाराष्ट्रातील १३ जिल्ह्याचा यात समावेश असून वर्धा जिल्ह्याचा यात समावेश करण्यात आला आहे. जिल्ह्यातील आदिवासी समाजाच्या विकासासाठी मोठी गौरवाची बाब आहे. जिल्ह्यातील आदिवासी समाजाच्या लाभार्थ्यांचे सामुहिक वन हक्क दावे लवकरच निकाली काढण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले म्हणाले. जिल्ह्यात स्ट्रॉबेरीसाठी पोषक वातावरण असून शेतक-यांना स्ट्रॉबेरी शेतीसाठी निधी उपलब्ध करुन देण्यात येईल, असे ते पुढे बोलतांना म्हणाले.

तत्पुर्वी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जनमन योजनेच्या लाभार्थ्यांशी थेट संवाद साधला. त्यांनतर जिल्ह्यातील जनमन योजनेंतर्गत सभागृह बांधकाम मंजूर प्रमाणपत्र, बिरसा मुंडा योजनेंतर्गत सिंचन विहिर मंजूरी प्रमाणपत्र, उमेद अंतर्गत आदिवासी गटांना कर्ज मंजूरी आदेशाचे मान्यवरांच्याहस्ते वितरण करण्यात आले. कार्यक्रमस्थळी विविध विभागांच्या योजनांचे स्टॉल लावून योजनाचा लाभ देण्यात आला. या स्टॉलला मान्यवरांनी भेटी देऊन समाधान व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आदिवासी विकास विभागाचे प्रकल्प अधिकारी दिपक हेडाऊ यांनी केले तर संचलन प्रफुल वाघ यांनी केले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येंन आदिवासी बांधव, नागरिक उपस्थित होते.

पाणी आणि माती हीच खरी राष्ट्राची संपत्ती- डॉ.राजेंद्र सिंह

चला जाणूया नदीला अभियान; विद्यार्थ्यांसाठी जलजागृती कार्यशाळा

वर्धा ■ प्रतिनिधी



वर्धा, दि.१४ (जिमाका) : सृष्टी आपणास सदैव शिकवते. मेघ पाणी देतात, झाडे फळ तर फुले सुगंध देतात. आपण सर्व त्याचा उपभोग घेतो. या सृष्टीला, नद्यांना आपण जपले पाहिजे. नदी आपली माता तर जंगल, वृक्ष हे पिता आहे. पाण्याचा थेंब अन् थेंब अडवून तो जिरविण्याचा प्रयत्न केला तर पृथ्वी पाणीदार व समृद्ध होईल, असे प्रतिपादन जलपुरूष मॅगसेसे पुरस्कार प्राप्त डॉ.राजेंद्र सिंह यांनी केले.

चला जाणूया नदीला अभियानांतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूर, विद्यापीठ शताब्दी समिती, राष्ट्रीय सेवा योजना, निसर्ग सेवा समितीच्या संयुक्त विद्यमाने ऑक्सिजन पार्क येथे डॉ.राजेंद्र सिंह यांचे विद्यार्थ्यांसाठी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी धाम नदीचे समन्वयक डॉ.भरत महोदय तर प्रमुख उपस्थिती म्हणून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाचे प्र.कुलगुरू डॉ.संजय दुधे, अभियानाच्या नोडल अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी प्रियांका पवार, जलबिरादरी महाराष्ट्र अध्यक्ष नरेंद्र चूग, जलतज्ञ व धाम नदी समन्वयक माधव कोटस्थाने, डॉ.राजेश भोयर, अभियानाच्या राज्य समितीचे सदस्य रमाकांत कुलकर्णी, नदी समन्वयक सुनील रहाणे, मुरलीधर बेलखोडे, सप्त खंजेरी वादक भाऊसाहेब थुटे उपस्थित होते.

पाणी व माती हीच खरी राष्ट्राची संपत्ती आहे, त्यामधूनच समृद्धी उगवते. नदीच्या संरक्षणासाठी माणूस, संस्कृती व निसर्ग यांच्यात चांगले नाते निर्माण झाले पाहिजे. पर्यावरण व नद्यांच्या संरक्षणाची प्रेरणा घेऊन भरीव कृतिशील युवक युवती तयार व्हावेत, या हेतूने व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी. महाविद्यालयीन ५०० पेक्षा अधिक युवकांनी कार्यक्रमात सहभाग घेतला. राज्य समितीचे सदस्य नरेंद्र चूग, रमाकांत कुलकर्णी, डॉ.संजय दुधे यांनी देखील यावेळी युवकांना मार्गदर्शन केले. प्रास्तविक निसर्ग सेवा समितीचे अध्यक्ष मुरलीधर बेलखोडे यांनी केले.

ऑक्सिजन पार्क परिसरात लावलेल्या विविध ८० प्रजातींची माहिती देणारे ॲप तयार करण्यासाठी मदत केल्याबद्दल प्रा.डॉ.सारंग धोटे यांचा डॉ.राजेंद्र सिंह यांच्याहस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन डॉ.शोभा बेलखोडे व किरण पट्टेवार यांनी केले. यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यापीठ समन्वयक आशिष पिसे, जिल्हा समन्वयक रवींद्र बन्नगरे यांनी सहकार्य केले. कार्यक्रमास दामोदर राऊत, बाळकृष्ण हांडे, अतुल शर्मा, अजय तिगावकर, मिलिंद भगत, ?ड.नंदकिशोर वानखेडे, शेख हाशम, प्रभाकर पुसदकर, श्री.सरवदे उपस्थित होते.

'रस्ता सुरक्षा' मोहिमेस लोकचळवळीचे स्वरूप आणावे - मंत्री दादाजी भुसे

राज्यस्तरीय रस्ता सुरक्षा मोहिमेचे उद्घाटन

वृत्तसंस्था ■ मुंबई



राज्यात होत असलेल्या मृत्यूंमध्ये सर्वात जास्त मृत्यू रस्ता अपघातांमध्ये होत आहेत. रस्ता अपघात टाळण्यासाठी रस्ता सुरक्षा ही काळाची गरज आहे. राज्य शासन १५ जानेवारी ते १४ फेब्रुवारी या एक महिन्यासाठी रस्ता सुरक्षा अभियान राबवित आहे. या अभियानाचा रस्ता सुरक्षा, वाहतुकीचे नियम याबाबत जनजागृती करून अपघात कमी करण्याचा उद्देश आहे. रस्ता सुरक्षा मोहिमेत जनसहभाग वाढवून या मोहिमेला लोकचळवळीचे स्वरूप आणावे, असे आवाहन सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री दादाजी भुसे यांनी केले.

रस्ता सुरक्षा अभियानाचे उद्घाटन सह्याद्री अतिथीगृह येथे झाले. या कार्यक्रमाच्या उद्घाटनावेळी मार्गदर्शन करताना मंत्री श्री. भुसे बोलत होते. कार्यक्रमाला व्यासपीठावर शालेय शिक्षण मंत्री तथा मुंबई शहरचे पालकमंत्री दीपक केसरकर, परीवहन विभागाचे प्रधान सचिव पराग जैन - नैनुटीया, अतिरिक्त महासंचालक (वाहतूक) सुखविंदर सिंग, सहपोलीस आयुक्त (वाहतूक) प्रविण पडवळ, परिवहन आयुक्त विवेक भीमनवार, वेस्टर्न इंडिया ऑटोमोबाईल असोसिएशनचे नितीन डोसा उपस्थित होते.

रस्ता सुरक्षा हा विषय शालेय अभ्यासक्रमात असणे गरजेचे असल्याचे सांगत मंत्री श्री. भुसे म्हणाले की, रस्ता सुरक्षेचे संस्कार लहान वयातच बिंबविण्यासाठी शालेय अभ्यासक्रमात या विषयाचा समावेश करण्याचा विचार आता करावा लागेल. राज्यात होत असलेल्या अपघातांमध्ये ६० टक्के अपघात हे दुचाकीचे असतात. दुचाकी अपघात कमी करण्यासाठी हेल्मेट वापरण्याविषयी जनजागृती करण्यात यावी. अपघातांचे प्रमाण शून्यावर आणण्यासाठी वेगवेगळ्या उपाययोजना करण्यात येत आहे. अपघातग्रस्ताला उपचार देण्यासाठी नागरिक पुढे येत नव्हते. मात्र आता चित्र बदलत आहे. अनेक नागरिक पुढे येवून 'गोल्डन अवर' मध्ये उपचार देवून अपघातग्रस्तांचे प्राण वाचवित आहेत. रस्ता सुरक्षेबाबत उपाय योजना करण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सुचनेनुसार निधीची उपलब्धता होत आहे.

जिल्हा स्तरावर जिल्हा रस्ता सुरक्षा समिती कार्यरत आहे. त्यांच्या स्तरावर जिल्हा नियोजनमधून अपघात प्रवण स्थळे दुरूस्त करणे, जनजागृती आदींसाठी निधीची उपलब्धता करून देण्यात येत आहे. परिवहन महामंडळाप्रमाणे चालकांमध्ये जनजागृती करण्यात यावी. त्यासाठी मोहिम राबवावी. रस्ता सुरक्षा मोहिमेच्या पुढील वर्षीच्या कार्यक्रमात अपघातांचे प्रमाण यावर्षीच्या तुलनेत निश्चितच कमी होण्याची अपेक्षाही मंत्री श्री. भुसे यांनी व्यक्त केली.

रस्ते वाहतूक नियमांचे पालन करावे - दीपक केसरकर

रस्ते वाहतूक नियमांचे पालन करीत शिस्तबद्ध वाहने चालविल्यास अपघातांचे प्रमाण कमी होईल. अपघाताचे ठिकाण निश्चित करून त्या ठिकाणी जनजागृतीसाठी विशेष मोहिम राबवावी. रस्ता सुरक्षा ही अत्यंत महत्वाची आहे. वाहतुकीचे नियम पाळणे ही सामूहिक जबाबदारी आहे. नागरिकांमध्ये जनजागृती करून अपघाताचे प्रमाण कमी होण्याचे उद्दिष्ट ठेवून काम करावे, असे प्रतिपादन शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी केले.

परिवहन विभागामार्फत राज्य रस्ता सुरक्षा अभियानाला आजपासून सुरुवात झाली आहे. विविध नाविन्यपूर्ण उपक्रमाच्या माध्यमातून नागरिकांमध्ये वाहतूक नियमांबाबत जनजागृती करावी. स्पीड गनचा वापर करून अतिवेगावर नियंत्रण आणावे, त्यामुळे निश्चितच अपघात कमी होतील. चालकांनी कटाक्षाने वाहतूक नियम पाळावेत. नागरिकांना शिस्त लागणे व अपघाताचे प्रमाण कमी होणे उद्दिष्ट असून दंडाची वसुली करणे हे शासनाचे उद्दिष्ट नाही, असेही मंत्री श्री. केसरकर यांनी सांगितले.

परिवहन आयुक्त विवेक भीमनवार म्हणाले, परिवहन विभाग ३७ सेवा फेसलेस पद्धतीने देत असून या सेवांचा आतापर्यंत ६८ लाख ६१ हजार नागरिकांनी लाभ घेतला आहे. मोटार वाहन निरीक्षक व सहायक मोटार वाहन निरीक्षक यांच्या बदल्या ऑनलाईन पद्धतीने करण्यात आल्या आहेत. अपघात कमी करण्यासाठी विभाग अधिक प्रभावीपणे उपाययोजनांची अंमलबजावणी करीत आहे.

यावेळी मागील वर्षाच्या तुलनेत अपघातामध्ये लक्षणीय घट होण्यासाठी विशेष प्रयत्न केलेल्या मुंबई शहर आणि उपनगर, चंद्रपूर व नवी मुंबई येथील परिवहन विभागातील अधिकाऱ्यांचा रस्ता सुरक्षेबाबत अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय पुरस्कार देवून सत्कार करण्यात आला. तसेच अपघातग्रस्तांना मदत करणाऱ्या जीवनदूतांचा सन्मानही यावेळी करण्यात आला. यामध्ये खोपोली जि. रायगड येथील गुरूनाथ रामचंद्र साठीलकर व विजय सुरेश भोसले, खालापूर जि. रायगड येथील मो. हनिफ कर्जीकर, वर्धा येथील वायरलेस विभागातील हवालदार शशिकांत गजबे, मोटार वाहन निरीक्षक कराड येथील श्रीमती प्रसन्ना पवार यांचा समावेश आहे. मुंबई ते पुणे रस्त्यावर अपघातांचे प्रमाण मागील वर्षाच्या तुनलेत ३२ टक्के अपघात कमी केल्याबद्दल उप परिवहन आयुक्त भरत कळसकर, पनवेलचे प्रादेशिक परिवहन अधिकारी अनिल पाटील, पिंपरी चिंचवड प्रादेशिक परिवहन अधिकारी अतुल आदे यांचा गौरव करण्यात आला आहे. यासोबतच सहा. परिवहन आयुक्त जितेंद्र पाटील, परिवहन उप आयुक्त (प्रशासन) संजय मैत्रेवार, परिवहन उप आयुक्त (संगणक) संदेश चव्हाण यांचा विशेष कामगिरीसाठी गौरव करण्यात आला.

कार्यक्रमादरम्यान रस्ता सुरक्षा पुस्तिका आणि वेस्टन इंडिया ऑटोमोबाईल असोसिएशनच्या रस्ता सुरक्षा वार्षिक दिनदर्शिकेचे मान्यवरांच्या हस्ते विमोचन करण्यात आले. उपस्थितांना रस्ता सुरक्षेबाबत प्रतिज्ञाही देण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन मृण्मयी भजक यांनी, तर आभार प्रदर्शन अप्पर परिवहन आयुक्त जितेंद्र पाटील यांनी केले. कार्यक्रमाला परिवहन विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

इंटरसेप्टर वाहनांचा हिरवी झेंडी दाखवून शुभारंभ

रस्ता सुरक्षेच्यादृष्टीने महत्वाचे वाहन असलेल्या इंटरसेप्टर वाहनांना शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखविण्यात आली. यावेळी प्रधान सचिव पराग जैन - नैनुटीया उपस्थित होते. विभागाला १८७ इंटरसेप्टर वाहने उपलब्ध करून देण्यात आली आहे. यावेळी प्रतिनिधीक स्वरूपात ५ वाहनांना ताफ्यात दाखल करून घेण्यात आले.

संपादकीय...

सौंदर्य आणि सातत्य...

'फुटबॉल हा सोपा खेळ आहे. २२ खेळाडू फुटबॉलचा पाठलाग करतात. आणि अखेरीस जर्मन नेहमीच जिंकतात!'.. इंग्लंडचे विख्यात फुटबॉलपटू गॅरी लिनेकर यांचे हे तितकेच विख्यात उद्गारखेळाडू आणि प्रशिक्षक अशा दोन्ही भूमिकांतून विश्वचषक जिंकण्याची अलौकिक कामगिरी झागालो आणि बेकेनबाउर यांना साधली होती.'फुटबॉल हा सोपा खेळ आहे. २२ खेळाडू फुटबॉलचा पाठलाग करतात. आणि अखेरीस जर्मन नेहमीच जिंकतात!'.. इंग्लंडचे विख्यात फुटबॉलपटू गॅरी लिनेकर यांचे हे तितकेच विख्यात उद्गार. ते ज्या 'जिंकणाऱ्या' जर्मनांबद्दल बोलले, त्या जर्मनांमध्ये जिंकण्याची मानसिकता रुजवली फ्रान्झ बेकेनबाउर यांनी. १९६०चा उत्तरार्ध आणि १९७०चे दशक बेकेनबाउर यांच्या जर्मनीने गाजवले. फुटबॉल मेरुमणी ब्राझीलचे पेले अस्ताला गेल्यानंतर आणि योहान क्रायुफ यांच्या नेतृत्वाखाली डच फुटबॉल संघ अफलातून कामगिरी करत असताना, स्वतःचे झळाळते अस्तित्व सादर करत, या मातब्बर मंडळींना काही काळ निस्तेज करण्याची कामगिरी बेकेनबाउर यांनी करून दाखवली. ब्राझिलियन फुटबॉल रसिकांनी फुटबॉलचे वर्णन 'जोगो बोनितो' असे केले आहे. म्हणजे सुंदर खेळ. फुटबॉलमधील ब्राझीलच्या अढळपदामुळे हेच नाव आणि वर्णन सार्वत्रिक ठरले. सौंदर्यामुळेच खेळाच्या लोकप्रियतेची व्याप्ती पंचखंडात पोहोचली. फुटबॉल म्हणजे कौशल्य आणि ऊर्जा यांचा मेळ. यांत समतोल साधून दिग्विजयी होणे हे फुटबॉल संघांचे लक्ष्य असते. पण हे झाले या खेळाचे सरधोपट आणि स्वप्नाळू वर्णन. निव्वळ कौशल्य आणि ऊर्जेच्या पलीकडे या खेळात सखोल व्यामिश्रता असते. मैदानावर खेळताना त्रिमितीय अवकाशभान असावे लागते. संधी हेरण्याची नजर असावी लागते. धोकादायक प्रतिस्पर्ध्यासमोर पाय रोवून उभे राहण्याचा निर्धार लागतो. कोलाहली प्रेक्षकांसमोर धैर्य शाबूत ठेवण्याची कला लागते. त्याहीपलीकडे जाऊन, विविध व्यक्तिमत्त्वांना समान उद्दिष्ट साधण्यासाठी एकाच धाग्यात गुंफावे लागते. यासाठी ठायी नेतृत्व लागते. निष्णातांहून निष्णात गणल्या गेलेल्या फुटबॉलपटूंमध्ये असे बहुपैलुत्व नव्हते. ते ज्या मोजक्यांत होते, त्यांमध्ये बेकेनबाउर हे नाव पहिल्या तिघांत तरी घ्यावेच लागेल.जर्मन इंजिनीअरिंगची बिनचूक शिस्त आणि इटालियन डिझाइनची नजरखेचक नजाकत अशा मिलाफातून कुणी एखादी मोटार बनवली, तर तिचे नाव 'बेकेनबाउर' असे खुशाल ठेवावे! 'प्रशियन' कण्याच्या उंच चणीचे शरीर, शहामृगासारखी लांब ढांगांची लयबद्ध धाव, गरुडासारखी भिरभिरणारी बहुकोनीय नजर, ग्रीक देवतेसम देखणे व्यक्तिमत्त्व लाभलेले बेकेनबाउर जर्मनांच्या दृष्टीतून सम्राट होते. म्हणूनच 'डेर कायझेर' हा सम्राटासाठीचा जर्मन प्रतिशब्द हीच त्यांची ओळख बनली. आंतरराष्ट्रीय फुटबॉलमध्ये जर्मनी आणि क्लब फुटबॉलच्या विश्वात बायर्न म्युनिच यांचा दरारा सत्तरच्या दशकात निर्माण झाला आणि पुढे कित्येक वर्षे टिकून राहिला याचे श्रेय बेकेनबाउर यांना द्यावे लागेल. १९६६ च्या विश्वचषकापासूनच बेकेनबाउर हे नाव विश्वचषकाच्या दुनियेत गाजू लागले होते. तत्कालीन पश्चिम जर्मनीचा संघ अंतिम फेरीत यजमान इंग्लंडला भिडला, त्या वेळी वीस वर्षीय बेकेनबाउर यांच्यावर प्रतिस्पर्धी संघातील निष्णात बॉबी चार्ल्टन यांना थोपवण्याची जबाबदारी सोपवण्यात आली. गंमत म्हणजे चार्ल्टन यांच्यावरही बेकेनबाउर यांना रोखण्याची जबाबदारी होती! कारण मधल्या फळीत बचावात्मक जबाबदारी असूनही बेकेनबाउर कधीही सुसाटत प्रतिस्पर्ध्याच्या गोटात शिरायचे आणि गोल झळकवायचे. पुढे ते बचावपटू बनले. पण फुटबॉल व्यूहरचनेतील 'लिबेरो' ही खास जागा त्यांनी लोकप्रिय केली. बचावपटू असूनही कधीही मैदानात प्रतिस्पर्धी गोलपर्यंत मुसंडी मारून असे लिबेरो प्रतिस्पर्ध्याची मूळ रचनाच विस्कटवू शकतात. मात्र यासाठी त्यांना स्वतःच्या गस्तीचौकटीबाहेर काही काळ पडावे लागते आणि यात विलक्षण जोखीम असते. कारण प्रतिहल्ला झाल्यास, बचावफळीत एक भिडू कमी झालेला असतो. अशा प्रकारच्या व्यूहरचनेमध्ये असीम कौशल्य आणि हिंमत लागते. बेकेनबाउर यांच्यापाशी ती होती. गोल करण्यासाठी लागणारे कसब असूनही बेकेनबाउर त्या फंदात फारसे पडायचे नाहीत. ती जबाबदारी म्युलर, ब्राइटनर असे त्यांचे सहकारी पार पाडायचे. पण म्हणून बेकेनबाउर यांच्याकडून गोल होणारच नाही याची हमी कुणीही देऊ शकत नव्हते. त्यामुळेच ते अतिशय धोकादायक ठरायचे. १९७२ मध्ये युरो अजिंक्यपद आणि १९७४ मध्ये जगज्जेतेपद जर्मनीने मिळवले. १९७४ ते १९७६ अशी सलग तीन वर्षे बायर्न म्युनिचने युरोपियन क्लब अजिंक्यपद पटकावले. हे सर्व करंडक उंचावणारे बेकेनबाउर पहिले कप्तान होते. फुटबॉलमधील वार्षिक 'बॅलॉं डी ओर' हा प्रतिष्ठेचा वैयक्तिक पुरस्कार दोन वेळा पटकावणारे ते एकमेव बचावपटू.बेकेनबाउर हे आख्यायिका बनले, त्या सुवर्णपटाचा हा झाला पहिला भाग. दुसऱ्या भागाची सुरुवात झाली ऐंशीच्या दशकात. त्या काळात त्यांच्याकडे जर्मन संघाच्या प्रशिक्षकपदाची धुरा सोपवण्यात आली. ते साच्यातले प्रशिक्षक नव्हते. एकदा त्यांच्या खेळाडूंनी रात्रभर पार्टी आणि मद्यमस्ती केली. एकावरही त्यांनी कारवाई करण्याची इच्छादेखील बोलून दाखवली नाही. त्यांचे खेळाडूंना एकच सांगणे असे - मैदानावर जा नि आनंद लुटा. तो काळ जर्मनीसाठी आव्हानात्मक होता. हा संघ अंतिम फेरीत किंवा त्याच्या आसपास जात होता, पण तेथे जिंकत नव्हता. इटली, ब्राझील हे जुने प्रतिस्पर्धी अधिक सक्षम बनले होतेच. याशिवाय अर्जेंटिना, डेन्मार्क आणि मुख्य म्हणजे फ्रान्ससारखे संघ जर्मनीपेक्षा सरस कामगिरी करून दाखवू लागले होते. पण जर्मनीच्या फुटबॉल व्यवस्थेला आणि फुटबॉलपटूंना बेकेनबाउर यांच्याविषयी आदर होता. सत्तरच्या दशकात मैदानावर दाखवलेले नेतृत्व बेकेनबाउर यांनी थोडे फेरफार करून ऐंशीच्या उत्तरार्धात मैदानाबाहेर केले. पहिल्याच प्रयत्नात म्हणजे १९८६ मध्ये त्यांचा संघ अंतिम फेरीत धडकला. तेथे दिएगो मॅराडोनाच्या युवा, चपळ संघासमोर पराभूत झाला. पुढील विश्वचषक स्पर्धेत याच दोन प्रतिस्पर्ध्यांमध्ये अंतिम सामना झाला. तो जर्मनीने जिंकला. कारण जिंकण्याची मानसिकता तोपर्यंत बेकेनबाउर यांनी जर्मन संघात मुरवली होती. ते स्वच्छंदी होते. एकाच जागी घरोबा करून त्याचा मठ बनवण्याची त्यांची वृत्ती नव्हती. खेळाडू आणि प्रशिक्षक अशा दोन्ही भूमिकांतून विश्वचषक जिंकण्याची अलौकिक कामगिरी बेकेनबाउर यांनी करून दाखवली.पण अशी कामगिरी करणारे ते पहिले नव्हेत. तो मान जातो ब्राझीलचे मारियो झागालो यांच्याकडे. झागालो हे नाव सुपरिचित ब्राझिलियन फुटबॉलपटूंच्या मांदियाळीतले नव्हे. पेले, गॅरिंचा, सॉक्रेटिस, रोमारियो, रोनाल्डो, रोनाल्डिन्यो, काका, नेमार अशांची नावे जगभर ठाऊक. या रंगमंचावर झागालो हे नेहमीच विंगेत राहिले. तेही बेकेनबाउर यांच्यासारखे बचावपटूच, पण तरीही वेळ पडेल तेव्हा बगलेवरून सुसाटत धावत जायचे. १९५८ आणि १९६२ मधील विश्वविजेत्या ब्राझिलियन संघाकडून ते खेळले. तरी त्यांचे खरे कर्तृत्व दिसून आले, १९७०मधील सर्वोत्तम ब्राझिलियन विश्वविजेत्या संघाचे प्रशिक्षकपद सांभाळताना. नितांतसुंदर आक्रमक चाली रचताना बचावाचे भानही हवे या भूमिकेतून त्यांनी तो संघ बांधला. लोकांसमोर आला तो पेले आणि त्यांच्या सहकाऱ्यांचा अलौकिक खेळ. परंतु त्या संघाचे शिल्पकार होते मारियो झागालो. त्यांचे खेळाडूंना सांगणे असे - मनमुराद खेळा आणि त्या खेळाचा आनंद प्रेक्षकांना द्या.झागालो आणि बेकेनबाउर. विश्वविजेते खेळाडू आणि विश्वविजेते प्रशिक्षक. दोघेही गेल्या काही दिवसांत निवर्तले. या दोघांव्यतिरिक्त अशी सोनेरी दुहेरी कामगिरी करणारे केवळ फ्रान्सचे दिदिए देशांजच आता हयात आहेत. बेकेनबाउर आणि झागालो यांना फुटबॉलमधील सौंदर्याची जाण होती, तसेच सातत्याचे भानही होते. आज ब्राझील आणि जर्मनीकडे फुटबॉलमधील महासत्ता म्हणून कुणीही पाहत नाही. बहुधा सौंदर्य की सातत्य, या गोंधळात दोन्ही फुटबॉल संस्कृतींचे स्वत्व हरपलेले दिसते. दोन्ही व्यवस्था आज काहीशा कुचेष्टेचाच विषय ठरतात. बेकेनबाउर आणि झागालो यांचे निर्गमन हे त्यामुळेच प्रतीकात्मक आणि खंतावणारेही!

संक्रांत ही एक देवता मानली गेलीय!

(मकरसंक्रांती विशेष)...



भारत हा कृषीप्रधान देश आहे त्यामुळे या भारत देशात कृषी व्यवस्था व त्याच्याशी निगडित अनेक सण-समारंभ साजरे केले जातात. त्याचप्रमाणे मकरसंक्रांत हा जानेवारी महिन्यात व हिंदू पंचांगाप्रमाणे पौष या दहाव्या मराठी महिन्यात येणारा शेती संबंधित सण असून सौर कालगणनेशी संबंधित असा हा महत्त्वाचा भारतीय सण आहे. या दिवसांमध्ये शेतांत आणि मळ्यांमध्ये आलेल्या धान्याचे वाण स्त्रिया एकमेकींना देतात. हरबरे, ऊस, बोरे, गव्हाच्या ओंब्या, तीळ अशा गोष्टी सुगडात भरून त्या देवाला अर्पण करतात. बायका उखाणे घेतात व एकमेककींना 'तिळगूळ घ्या, गोड गोड बोला' असे म्हणतात.

मकरसंक्रांतीला महाराष्ट्रात नुसतेच संक्रांत म्हणतात. मकरसंक्रांती- उत्तरायण माघी संक्रांती, ज्याला पश्चिम बंगालमध्ये मोकोर सोनक्रांती म्हणूनही ओळखले जाते आणि नेपाळमध्ये माघे संक्रांती, येथे संक्रांती म्हणजे हस्तांतरण, हा दिवस सूर्याचा मकर राशीत संक्रमण दिवस मानला जातो. आता हिंदू दिनदर्शिकेमध्ये सूर्य उत्तरेकडे सरकतो. सूर्य या देवतेला समर्पित, अनेक स्थानिक बहु-दिवसीय उत्सव संपूर्ण भारतात आयोजित केले जातात. ग्रेगेरियन दिनदर्शिकेनुसार जानेवारी महिन्यात सूर्य मकर राशीत प्रवेश करतो, तो दिवस दरवर्षी साजरा केला जातो. सूर्याच्या मकर राशीत प्रवेशाचा तो पहिला दिवस आहे. लीप वर्षांमध्ये एक दिवस जोडल्यामुळे, मकर संक्रांतीची तारीख थोडी बदलू शकते. लीप वर्षात ते १५ जानेवारीला येते, अन्यथा १४ जानेवारीला असते. मकर संक्रांतीशी संबंधित सण आसाममध्ये माघ बिहू, पंजाबमध्ये माघी, हिमाचल प्रदेशात माघी साजी, जम्मूमध्ये माघी संग्रांद किंवा उत्तरायण, हरियाणामध्ये सक्रत, राजस्थानमध्ये सकरत, मध्य भारतात सुकरात, पोंगल अशा विविध नावांनी ओळखले जातात. तामिळनाडूमध्ये उत्तरायण, गुजरात आणि उत्तर प्रदेश, उत्तराखंडमध्ये घुघुटी, बिहारमध्ये दही चुरा, ओडिशामध्ये मकर संक्रांती, कर्नाटक, महाराष्ट्र, गोवा, पश्चिम बंगाल- ज्याला पौष संक्रांती देखील म्हणतात, उत्तर प्रदेश -खिचडी संक्रांती देखील म्हणतात. उत्तराखंड- ज्याला उत्तरायणी देखील म्हणतात किंवा सोप्या भाषेत, आंध्र प्रदेश आणि तेलंगणामधील संक्रांती, माघे संक्रांती- नेपाळ, सोंगक्रान- थायलंड, थिंगयान- म्यानमार, मोहन सोंगक्रान- कंबोडिया आणि शिशूर, सेनक्राथ- काश्मीर आदी.

मकर संक्रांती हा सामाजिक सण आहे. हा सण रंगीबेरंगी सजावट, ग्रामीण मुलांनी घरोघरी जाणे, गाणी गाणे आणि काही भागात भेटवस्तू मागणे, मेळे, नृत्य, पतंग उडवणे, शेकोटी पेटवणे आणि मेजवानी यांसारख्या सामाजिक उत्सवांनी साजरी केली जाते. इंडोलॉजिस्ट डायना एल. एक यांच्या मते मघा मेळ्याचा उल्लेख हिंदू महाकाव्य महाभारतात आहे. अनेक निरीक्षक पवित्र नद्या किंवा तलावांवर जातात आणि सूर्याला धन्यवाद देण्यासाठी स्नान करतात. दर बारा वर्षांनी, हिंदू कुंभमेळ्यासह मकर संक्रांत पाळतात- जगातील सर्वात मोठ्या सामूहिक तीर्थक्षेत्रांपैकी एक, अंदाजे ६० ते १०० दशलक्ष लोक या कार्यक्रमाला उपस्थित राहतात. या कार्यक्रमात, ते सूर्याला प्रार्थना करतात आणि गंगा व यमुना नदीच्या प्रयागराज संगमावर स्नान करतात, या परंपरेचे श्रेय आदि शंकराचार्यांना दिले जाते.

दरवर्षी २१-२२ डिसेंबरला सूर्याची किरणे पृथ्वीच्या साडेतेवीस दक्षिण या अक्षांशावर लंबरूपात पडतात आणि त्या दिवसापासून सूर्याचे उत्तरायण सुरू होते. इसवी सनाच्या सुरुवातीच्या वर्षांत सूर्य त्याच सुमारास मकर राशीमध्ये संक्रमण- प्रवेश करीत असे, त्यामुळे साडेतेवीस दक्षिण या अक्षवृत्ताला मकरवृत्त म्हणू लागले. पुढच्या काळात सूर्याच्या उत्तरायणाची सुरुवात २१-२२ डिसेंबरलाच होत राहिली, तरी पृथ्वीच्या परांचन गतीमुळे सूर्याच्या मकरसंकमणाची तारीख पुढेपुढे जात राहिली. साहजिकच हिंदूंच्या मकरसंक्रांत या सणाची तारीख बदलत राहिली. मकरसंक्रांतीच्या दिवशी सूर्य धनू राशीतून मकर राशीत प्रवेश करतो. सूर्याचे उत्तरायण आधीच म्हणजे २१-२२ डिसेंबरलाच सुरू झालेले असते. अर्थातच त्या दिवसापासून सूर्याचे उत्तरायण सुरूच असते. पृथ्वीवरून पाहिले असता २१-२२ डिसेंबरपासून सूर्याच्या उगविण्याची जागा दिवसेंदिवस उत्तरेकडे सरकत जाते. महाभारतात कुरु वंशाचे संरक्षक भीष्म हे बाणांच्या शय्येवर- शरशय्येवर उत्तरायणाची वाट पहात पडून होते. त्यांना इच्छामरणाचे वरदान होते. ज्या दिवशी उत्तरायण सुरू झाले त्यादिवशी त्यांनी प्राणत्याग केला. भारतीय परंपरेत उत्तरायणाचा काळ दक्षिणायनापेक्षा अधिक शुभ मानला जातो. संक्रांत ही एक देवता मानली गेली असून प्रतिवर्षी ती येताना वेगवेगळ्या वाहनावर बसून येते, अशी समजूत प्रचलित आहे. कधी तिचे वाहन हत्ती, कधी गाढव तर कधी डुक्कर असते. मात्र यामागे नेमका काय कार्यकारणभाव आहे ? हे मात्र नोंदविलेले दिसून येत नाही. संक्रांतीचा आदला दिवस महाराष्ट्रात भोगी या नावाने साजरा होतो. या हवामानात उपलब्ध सर्व शेंगभाज्या, फळभाज्या यांची तिळाचा कूट घालून केलेली मिश्र भाजी, तीळ लावलेली बाजरीची भाकरी, लोणी अणि मुंगाची खिचडी असे पदार्थ या दिवशी आवर्जून केले जातात. संक्रांतीच्या दिवशी गुळाची पोळी आणि तिळगुळाचे विशेष महत्त्व असते.

महाराष्ट्रात हा सण तीन दिवस साजरा करतात. यास भोगी- सामान्यतः १४ जानेवारी, संक्रांत- सामान्यतः १५ जानेवारी व किंक्रांत- सामान्यतः १६ जानेवारी, अशी नावे आहेत. संक्रांतीस आप्तस्वकीयांना, मित्रमंडळींना आणि लहान मुलांना तिळगुळ, तिळाचे लाडू, वड्या किंवा तिळाचा हलवा आणि स्त्रियांना वाण वाटून 'तिळगुळ घ्या आणि गोड बोला' असे सांगून स्नेह वृद्धिंगत होण्याची शुभकामना दिली जाते. विवाहित स्त्रिया या दिवशी आणि या दिवसापासून हळदीकुंकू करतात. रथसप्तमी हा संक्रांतीच्या हळदीकुंकवाचा शेवटचा दिवस असतो. मराठी स्त्रिया संक्रांतीच्या दिवशी आवर्जून काळी साडी नेसतात. आसाम- भोगाली बिहू, पश्चिम बंगाल- मकर संक्रान्ति, ओरिसा - मकर संक्रान्ति, पश्चिम भारतात- गुजरात व राजस्थान - उतरायण- पतंगनो तहेवार- पतंगांचा सण, गुजरातमध्ये या दिवशी धान्य, तळलेल्या मिठाया, खाद्यपदार्थ बनवले व दान केले जातात. गुजरातेत या दिवशी गहू, बाजरी यांच्या खिचड्या बनवल्या जातात.

गुजरातमध्ये मकरसंक्रांतीचा दिवस उत्तराण म्हणून ओळखला जातो. या दिवशी घरोघरी लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वजण पतंग उडवतात. हा पतंगोत्सव पाहण्यासाठी जगभरातील पर्यटक गुजरातला भेट देतात. दक्षिण भारतात- कर्नाटक, आंध्र प्रदेश - संक्रांति, तमिळनाडू - पोंगल, दक्षिण भारतात पोंगल सण ३ दिवस साजरा होतो. भोगी पोंगल या दिवशी होळी पेटवून त्यात घरातील अनावश्यक वस्तू टाकतात. मुली त्या होळीभोवती फेर धरून नाचतात. सूर्य पोंगल या दिवशी तांदूळ, गूळ, दूध यांची खीर करून तिचा नैवेद्य दाखवितात. मुडू किंवा कननु पोंगल या दिवशी गोठ्यातील जनावरांची पूजा केली जाते. याच दिवशी भावाच्या चांगल्या आयुष्यासाठी बहिणी पूजा करतात व भावाला ओवाळतात. शबरीमला मंदिरात मकर वल्लाकु उत्सव होतो. भारताबाहेरील देशात- नेपाळमध्ये, थारू लोक - माघी, अन्य भागात माघ संक्रान्ति, थायलंड- सोंग्क्रान, लाओसठ- पि मा लाओ, म्यानमार- थिंगयान साजरा करतात. मकरसंक्रांतीच्या दिवशी कलकत्ता शहरानजीक गंगा नदी जेथे बंगालच्या उपसागरास मिळते, त्या गंगासागर नावाच्या ठिकाणी गंगासागर यात्रा आयोजित केली जाते. हिमालयातील देवप्रयाग, मुनी की रेती, कीर्तिनगर, व्यासघाट या ठिकाणी संक्रातीच्या निमित्ताने मेळे भारतात. या दिवशी केरळमधील शबरीमला डोंगरावर मकरज्योतीचे दर्शन घेण्यास अनेक भाविकांची गर्दी होते. मकर संक्रांतीच्या आदल्या दिवसाला भोगी असे म्हणतात. भोगी हा आनंदाचा आणि उपभोगाचा सण म्हणून मानला जातो. या दिवशी सकाळी आपले घर तसेच घरासभोवतालचा परिसर स्वच्छ केला जातो. दरवाजासमोर रांगोळी काढतात. घरातील सर्व जण अभ्यंगस्नान करून नवीन कपडे परिधान करतात. महिला नवीन अलंकार धारण करतात. सासरच्या मुली भोगीचा आनंदोत्सव साजरा करण्यासाठी या दिवशी माहेरी येतात. कुटुंबातील सर्वजण एकत्र येऊन भोगीचा आनंदोत्सव साजरा करतात. दुपारी जेवणाचा बेतही खास भोगीचा असतो. तीळ लावलेल्या भाकऱ्या, लोणी, पापड, वांग्याचे भरीत, चटणी आणि खमंग खिचडी असा लज्जतदार खास बेत असतो. प्रथम या पदार्थाचा देवाला नैवेद्य दाखवून सर्वजण एकत्र जेवायला बसतात. वांग्या-बटाट्याच्या जोडीला हिरवागार घेवडा, पापडी, हरबऱ्याचे हिरवेगार दाणे, कोनफळ, लालचुटुक गाजरे, भुईमुगाच्या आणि इतर सर्व प्रकारच्या शेंगा यांच्या भेसळभाजीला भोगीची भाजी म्हणतात. दक्षिण भारतात हा दिवस भोगी पोंगल म्हणून साजरा करतात. या दिवशी इंद्राची पूजा करून आप्तजनांसह मिष्टान्न भोजन करण्याची प्रथा आहे.

मकर संक्रांतीचा सण संपूर्ण भारतात साजरा केला जातो. या दिवशी दान देण्याला विशेष महत्त्व आहे. देवीपुराणातील हा श्लोक साक्ष देतो-

'संक्रांतौ यानि दत्तानि दव्यकव्यानि मानवैः।
तानि नित्यं ददात्यर्कः पुनर्जन्मनि जन्मनि।।'

मकर संक्रांतीच्या दिवशी जी माणसे दान देतात आणि हव्यकव्ये करतात, त्या-त्या वस्तू सूर्य त्यांना प्रत्येक जन्मात देत असतो, अशी खुळी समज आहे. आधुनिक कालात दान देण्याच्या गोष्टींच्या यादीमध्ये विद्यादान, श्रमदान, रक्तदान, वस्त्रदान, अन्नदान, नेत्रदान याही गोष्टींचा समावेश व्हावयास हवा. यादिवशी घरातील आणि गावच्या मंदिरातील देवाला तीळ-तांदूळ वाहतात. सुगडात गहू, उसाचे तुकडे, हळकुंडे, कापूर, बोरे, द्रव्य इत्यादी वस्तू घालून ते दान देण्याची प्रथा आहे. मकर संक्रांतीच्या दिवशी नववधूला हलव्याचे दागिने घालून जावयाला तिळगूळ आणि आहेर देण्याची पद्धत महाराष्ट्रात आहे. तिळावर साखरेचा पाक चढवून हलवा करण्याची प्रथा आहे. या दिवशी महिला एकत्र येऊन हळदीकुंकू समारंभ करतात, तिळगुळ वाटतात. महाराष्ट्रात अशा समारंभात प्रत्येकीला काही तरी वस्तू भेट देण्याची प्रथा आहे. लहान मुलांना लुटले जाते. या दिवशी महिला काळे वस्त्र परिधान करतात. मकर संक्रांतीचे दिवस हे थंडीचे असतात. काळ्या रंगाचे वस्त्र हे उबदार असते. काळ्या मोठ्या रात्रीला निरोप देण्याच्या उद्देशानेही असे काळ्या रंगाचे वस्त्र नेसण्याची प्रथा पडली असावी. मकर संक्रांतीचा सण हा स्नेहवर्धनाचा सण असतो. मकर संक्रांतीच्या दिवसापासून उत्तरायणारंभापासून मोठे झालेले दिनमान जाणवू लागते. पूर्वी इलेक्ट्रिसिटी नव्हती. त्या वेळी माणसे सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंतच कामे करावयाची. दिनमान वाढत जाणार म्हणजे अधिक काम करण्याची संधी मिळणार! म्हणून मकर संक्रांतीचा सण हा आनंदाचा सण म्हणून साजरा केला जातो. थंडीच्या दिवसात तीळ हे अधिक आरोग्यदायी असतात. 'फरगीविह ?न्ड फरगेट' हा संदेश या सणाद्वारे दिला जातो. जीवनात आनंद फुलवण्याचा प्रयत्न केला जातो. महाराष्ट्रात या दिवशी लहान मुलांनाही हलव्याचे दागिने घालून बोरन्हाण घालण्याची- त्यालाच काही ठिकाणी लूट म्हणतात, ही एक प्रथा आहे. बंगालमध्ये या दिवशी काकवीत तीळ घालून तिळुवा नावाचा पदार्थ तयार करून इष्ट मित्राना देतात. तसंच तांदुळाच्या पिठात तूप-साखर मिसळून पिष्टक नावाचा पदार्थ तयार करून तोही वाटतात. मकर संक्रांतीच्या दिवशी प्रयाग इथे मोठी यात्रा भरते. अनेक भाविक गंगास्नान करतात. दक्षिणेतही ताम्रपर्णी नदीमध्ये स्नान करण्यासाठी अनेक लोक तिरुवनवेल्ली जिल्ह्यामध्ये जात असतात. हिमालयाच्या सरूळ भागात या दिवशी पिठाचे पक्षी करून ते तुपात तळतात व लहान मुलांच्या गळ्यात बांधतात. दुसऱ्या दिवशी ते पक्षी कावळ्याना खाऊ घालतात. दक्षिण भारतात हा दिवस सूर्य पोंगल किंवा पेरूम पोंगळ म्हणून साजरा करतात. या दिवशी अंगणात दुधातही तांदुळाची खीर शिजवतात. खिरीला उकळी आली, की 'पोंगल ओ पोंगल' म्हणून ओरडतात. मकरसंक्रांतीच्या दिवशी संक्रांतीदेवीने संकारसूर या राक्षसाचा वध करून सर्व लोकांना सुखी केले अशी कथा आहे. संक्रांतीचा दुसरा दिवस किंक्रात म्हणून साजरा करतात. संक्रांतीदेवीने मकर संक्रांतीच्या दुसऱ्या दिवशी किंकरासुर नावाच्या राक्षसाला ठार मारले आणि त्याच्या जाचातून प्रजेला मुक्त केले. म्हणून हा दिवस किंक्रांत म्हणून पाळला जातो. पंचागात हा दिवस करिदिन म्हणून दाखवलेला असतो. हा दिवस शुभकार्याला घेतला जात नाही. या दिवशीही स्त्रिया हळदीकुंकू समारंभ साजरा करतात.

दक्षिण भारतात किंक्रांतीचा दिवस 'मट्टू पोंगल' म्हणून साजरा करतात. या दिवशी गाई-बैलांना स्नान घालून त्यांच्या गळ्यात फुलांच्या माळा घालतात. त्यांच्या शिंगाना बेगड लावून त्यांना सजवतात. गुरांना दुपारी गोडधोड जेवण घालून दिवसभर त्यांना मोकळे सोडतात. संध्याकाळी त्यांची गावातून मिरवणूक काढतात. त्यानंतर नृत्यगायनाचा कार्यक्रमही केला जातो.

!! मकरसंक्रांतीच्या सर्व भावाबहिणींना 'तिळगूळ घ्या, गोड गोड बोला' हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

- संकलन व सुलेखन -
बापू- श्रीकृष्णदास निरंकारी.
द्वारा: प.पू.गुरुदेव हरदेव कृपानिवास.
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सॲप- ९४२३७१४८८३.

चेक मेट...

जाहीर जाहले बजेट
आता युद्ध होईल थेट
बस वाच आणि वेट
आता चेक आणि मेट

महत्वआपले जाणतो
दुडुक्याचालीचा घोडा
कधी मित्र कधी शत्रू
सारखा घालतो खोडा

सारे उंटावरचे शहाणे
तिरकस त्याचे वागणे
शेजारीच राहूनि उभे
का काढतात उणे दुणे

हत्तीची सरळ धडक
कसा बोलतो बेधडक
शक्ती आपली जाणतो
म्हणून एवढा कडक

गमतीचं भलतं प्यादं
जरी दिसत साधुसुधं
मरायला सदैव सिध्द
कधी जिकून देत युध्द

राजा जवळचा वजीर
भलता झाला अधीर
वाटतं सुटलाय ताट
निवण्याआधीच खीर

वेगळाचं असतो राजा
करी किती गाजावाजा
भुंकणारे भुंको किती
त्याचा तयोर बेडबाजा

- हेमंत मुसरीफ पुणे
९७३०३०६९९६

कन्या...

आश्वासने कागदाची
म्हणता हवे ते मागा
फुटूनि जाईलं उगा
फुगवालं किती फुगा

महिलासाठी केल्या
आरक्षीत त्या जागा
आरक्षीत जागेवरती
बसलेला असे टगा

शरीर वरून सुडौल
मनास पडल्या भेगा
जळू फळाट पुरुषा
मुली चालल्या वेगा

म्हणता केल्या सोई
रे खास महिला वर्गा
महिलासाठी बददार
मदीर असो वा दर्गा

पूरुषी नजरा चाळवे
कुठे फाटलायं झगा
विणे मखमली वस्त्र
कच्चा आतूनि धागा

म्हणे नारी सुरक्षीत
मोकळे प्रमाणे वागा
महिलापेहराव असा
हे ही तुम्हीच सागा

यशस्वी होताचं नारी
पूरुषी अहम् जागा
कन्या दिवशी निदान
दिल्या वचना जागा

- हेमंत मुसरीफ पुणे
९७३०३०६९९६

शिवरायांच्या अतुलनीय पराक्रमाचे साक्षीदार झाले नागपूरकर

जाणता राजाच्या प्रयोगांना प्रेक्षकांचा उस्फूर्त प्रतिसाद

नागपूर ■ दिलीप येवले





छत्रपती शिवाजी महाराजांचा पराक्रम व तेजस्वी व्यक्तीमत्व प्रभावीपणे मांडणाऱ्या 'जाणता राजा' महानाट्याला नागपूर जिल्ह्याच्या विविध भागातील जनतेने उदंड प्रतिसाद दिला.या माध्यमातून शिवचरित्र घराघरात पोहचल्याचे समाधान प्रशासनाने अनुभवले.गेल्या तीन दिवसांपासून यशवंत स्टेडियम येथे सुरु असलेल्या महानाट्याचा समारोप सोमवार दि.१५ जानेवारीला झाला.शेवटच्या दिवशीही प्रेक्षकांचा भरभरून प्रतिसाद दिला.

शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाच्या ३५० वर्षे पूर्ण झाल्याच्या औचित्याने सांस्कृतिक कार्य विभागामार्फत राज्याच्या अनेक जिल्ह्यांमध्ये शिवचरित्रावर आधारित महानाट्य राज्यात आयोजित करण्यात येत आहे.शनिवार दि.१३ जानेवारी रोजी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते 'जाणता राजा' महानाट्याचा राज्यस्तरीय शुभारंभ झाला. जिल्हा व महानगरपालिका प्रशासनाने या महानाट्याचे यशस्वी आयोजन केले होते.

प्रयोगाआधी दररोज मान्यवरांच्या हस्ते आरती झाली. समारोपाच्या प्रयोगाची आरती आमदार चंद्रशेखर बावनकुळे,विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी,अतिरिक्त आयुक्त डॉ.माधवी चौरे, मनपा आयुक्त डॉ.अभिजीत चौधरी,जिल्हाधिकारी डॉ.विपीन इटनकर व प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी आदिंच्या उपस्थितीत झाली. यावेळी महानाट्याचे प्रमुख तथा महाराजा शिवछत्रपती प्रतिष्ठानचे अजित आपटे यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

शिवरायांच्या जन्मापूर्वीचा महाराष्ट्र आणि त्यांच्या जन्मानंतर राजमाता जिजाऊ माँ साहेब यांनी लहानग्या शिवबांना दिलेले बाळकडू व मावळ्यांची मोट बांधून शिवबांनी स्वराज्य निर्मितीची घेतलेली शपथ, अशा या महानाट्यातील अनेक प्रसंगांनी उपस्थितांच्या काळजाचा ठाव घेतला. एकूण २०० पेक्षा अधिक कलाकार व तंत्रज्ञांचा भव्य फिरत्या रंगमंचावर लिलया व नेटका वावर प्रेक्षकांना खिळवून ठेवत होता. नागपुरातील ७० कलाकारांनी या महानाट्यात बाल शिवाजी, राणी सईबाई, कान्होजी जेधे, तानाजी मालुसरे, अष्टप्रधान अशा वैविध्यपूर्ण भूमिका वठवल्या.

जवळपास साडे तीन तास चालणाऱ्या या महानाट्यात छत्रपती शिवाजी महाराजांचे शौर्य, मुत्सदेगिरी,प्रशासनावरील जरब, सौहार्द, निर्णयशक्ती दर्शविणारे प्रसंग, अफजलखानाचा वध,शाहिस्ते खानाची लाल महालातील कोंडी, छत्रपतींची आर्ग्याहून सुटका ,राज्याभिषेक आदी प्रसंग गतइतिहास डोळ्यासमोर उभा झाला. सोबतीला पोवळे,भारुड, गौळणी, गोंधळ, वाघ्या -मुरळी,लावणी, कोळी नृत्य आदी लोककलांची महानाट्यातील नेमकी गुंफण आकर्षक ठरली. रंगमंचावरील प्रसंगानुरुप देखावे, घोडे, उंट ,तोफांचा वापर, साजेसे नैपथ्य, प्रकाश व संगीत संयोजन,संवादाची उत्तम फेक या सर्वांनीच प्रेक्षकांना खिळवून ठेवले.

शिवराज्याभिषेकाचा प्रसंग प्रेक्षकांमध्ये स्वराज्याच्या महानायकाचा सर्वोच्च सन्मान असल

विकसित भारत संकल्प चित्ररथ यात्रा मोहगांवात मोठ्या उत्साहात स्वागत : देण्यात आली सरकारच्या विविध योजनांची माहिती

समुद्रपूर ■ अमोल झाडे



समुद्रपुरः केंन्द्र शासनाच्या विविध योजनांची माहिती जनसामान्यां पर्यंत पोहचविण्यासाठी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून भारत व महाराष्ट्र राज्य शासनाच्या संयुक्त विद्यमाने भारत संकल्प यात्रेचे आयोजन करण्यात आले असून.हि यात्रा १५ जानेवारीला मोहगांव येथे दाखल होताच उपस्थित लोकप्रतिनिधींसह नागरिकांनी मोठ्या उत्साहात या चित्ररथ यात्रेचे स्वागत केले.यावेळी ग्रामपंचायतीच्या प्रांगणात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मोहगाव येथिल सरपंच विलास नवघरे, प्रमुख पाहुणे उपसरपंच सपनाताई बाभळे, ग्रामसेवक संतोष पुरकाम, मुख्याध्यापक रमेश वाघमारे,तंटामुक्त समितीचे अध्यक्ष अनिल धोटे, पोलिस पाटील मेघाताई धोटे, ग्रामपंचायत सदस्य जगदीश महातळे,संदिप दातारकर, प्रणालीताई वांढरे,सुनिताताई वाघाडे, डॉ श्यामा प्रसाद मुखर्जी समितीचे अध्यक्ष अंकुश मांडवकर वनरक्षक विजय दिघोळे, कृषि सहाय्यक राम अरगडे प्रामुख्याने उपस्थित होते.यावेळी उपस्तितीत मान्यवरांच्या हस्ते चित्ररथाचे व डॉ बाबासाहेब आंबेडकर ,संत गाडगेबाबा व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून माल्यार्पण करण्यात आले. चित्ररथाचे पुजन पाहुण्यांचे हस्ते करण्यात आले. प्रसंगी विकसित भारत संकल्प शपथ देण्यात आली.तसेच गुणवंत विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला. सरपंच विलास नवघरे यांनी विकसित भारत संकल्प चित्ररथ यात्रेचे उद्दिष्ट म्हणजे केंद्र शासनाच्या विविध योजनांची माहिती जनसामान्यांपर्यंत पोहचविण्यासाठी असून या यात्रेच्या माध्यमातून दिल्या जाणारी माहिती घेऊन आपण सुध्दा या योजनेचा लाभ द्यावा असे आवाहन केले.ग्रामसेवक संतोष पुरकाम यांनी केंद्र सरकारच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती दिली.कृषि सहाय्यक राम अरगडे यांनी कृषी विभागाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या योजना माहिती दिली तर वनरक्षक विजय दिघोळे यांनी डॉ श्यामा प्रसाद मुखर्जी योजनेची माहिती देत वृक्षतोड थांबविण्यासाठी वनविभाच्या वतीने देण्यात येणाऱ्या एलपीजी गॅस सिलिंडर लाभ घेण्याचे आवाहन केले. शेतकऱ्यांना ड्रोन फवारणी प्रात्यक्षिक करून दाखविण्यात आले.आरोग्य विभागाच्या वतीने विद्यार्थ्यां व नागरिकांची तपास तसेच आयुष्यमान भारत कार्ड काढून देण्यात आले.यावेळी आतापर्यंत शासनाच्या विविध योजनांची माहिती घेतलेल्या नागरिकांनी आपले मनोगत व्यक्त केले.या कार्यक्रमाला बचत गटाच्या सिआरपी संगिताई लाटकर, शुभांगी खुरपडे,ताराबाई मसराम, चंद्रशेखर बुधेवार, प्रशांत शेवडे,आरोग्य विभागाच्या आरोग्य सेविका गोटे लोखंडे, ग्रामसंघाच्या पदाधिकारी व गावातील बचत गटाच्या महिला, पुरुष शेतकरी, विद्यार्थी व मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्री संत बऱ्हाणपुरे महाराज प्रकटदिन सोहळा मोठ्या उत्साहात साजरा



समुद्रपूर ■ अमोल झाडे

समुद्रपुरः मांडगाव चे आराध्य दैवत श्री संत बऱ्हाणपुरे महाराज यांच्या प्रकटदिना निमीत्य स्थानिक सार्वजनिक महादेव मंदिर येथे संगीतमय श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सप्ताहाचे आयोजन तसेच हरिपाठ भजन काल्याचे कीर्तन करण्यात आले होते यावेळी सात दिवस गाव भक्तीमय वातावरणात लीन होऊन मोठ्या संख्येने उत्साहात नवीन वर्षाच्या पहिल्याच महिण्यात मकर संक्रांतीच्या पर्वावर हा सण साजरा करण्यात येतो जगन्नाथ नेहारे महाराजांनी आपल्या सहकार्यासह संगीतमय भागवत करून सर्वांना मंत्रमुग्ध केले यावेळी रवीवारला श्रींची पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते महादेव मंदिर येथे सकाळी आरती करून गावात मुख्य मार्गाने पालखी काढण्यात आली या सोहळ्यात गावातील बाहेर गावातील पालख्यांनी भजनी मंडळींनी तसेच लहान मुले शाळकरी मुले वेगवेगळ्या रंगभुषेत सहभागी झाले होते गावकर्यांनी ठिकठिकानी रस्त्यांवर रांगोळी फुलपाकळ्यानी तसेच तोरणांनी सजावट करित चहा पाणी ची व्यवस्था पालखीतील भावीकांसाठी केली होती मुख्यमार्गाने प्रदक्षीणा करीत पालखी महादेव मंदिर येथे पोहचली व आरती करून प्रसाद वितरण व भजनी मंडळी ना नारळपान समारंभ संपन्न झाला लगेच महाप्रसादाला सुरवात झाली मंदीर परीसर यात्रेने भाविकांनी गजबजून गेला होता तसेच या कार्यक्रमा दरम्यान सामाजीक संस्था बुलंद आवाज ग्रुप तर्फे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते दिया रक्त ना व्यथ ? जायेगा, एक दिन मे वापस आयेगा.दिवसागणिक रक्ताची गरज ओळखता व रुग्णांना रक्त उपलब्ध व्हावे या दृष्टिकोनातून श्री संत बऱ्हाणपुरे महाराज यांच्या प्रगट दिनानिमित्त भव्य रक्तदान शिबीर आयोजित करून आपण समाजाचे देन लागतो या भावनेतून रक्तदान करण्यात आले. सेवाग्राम येथील रक्तपेढी व संपूर्ण टीम तसे बुलंद आवाज ग्रुप मांडगाव यांच्या माध्यमातुन तीस ते पस्तीस रक्तदात्यांनी रक्त दान केले तसेच आधल्या दिवशी शनीवारला देशपांडे मलिस्पेशालिटी हॉस्पिटल तर्फे निःशुल्क आरोग्य तपासणी शिबिर विठ्ठलरावजी तडस यांच्या वाड्यात घेण्यात आले होते.

भाजपची नरखेड शहर कार्यकारिणी जाहीर

नरखेड ■ अतुल दंढारे



भाजपची नरखेड शहर कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे. कार्यकारीणीत स्थान मिळालेल्या प्रत्येक पदाधिकाऱ्याने आपली जबाबदारी चोखपणे पार पाडावी व नवीन लोकांना जोडून संघटना मजबूत करण्यासाठी प्रयत्न करावा असे आवाहन भाजपा जिल्हाध्यक्ष सुधाकर कोहळे यांनी केले आहे.

नरखेड शहर भाजपच्या विस्तारित कार्यकारिणीची सभा व भव्य कार्यकर्ता मेळावा प्रचंड गर्दीत संत सावता सभागृहात पार पडला. अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार सुधाकर कोहळे होते. प्रमुख अतिथी म्हणून रामटेक लोकसभा समन्वयक डॉ राजीव पोतदार, लोकसभा प्रमुख अरविंद गजभिये, काटोल विधानसभा प्रमुख चरणसिंग ठाकूर, जिल्हा महामंत्री दिनेश ठाकरे, जिल्हा उपाध्यक्ष उकेश चव्हाण, मनोज कोरडे, शामराव बारई, विस्तारक विशाल भोसले, नामदेव महाराज लोणगाडगे, दिलीप तांदळे,भाजप तालुका अध्यक्ष दिलेश ठाकरे, महामंत्री संजय कामडे, जि. प सदस्या पार्वताताई काळबांडे, रमेश क्षीरसागर, सुरेश खसारे, निखिल जैस्वाल, किशोरी कहाते, कविता शेंदरे, छाया खुरसंगे, इस्माईल बारुदवाले, स्वप्नील नागापूरे, प्रमोद वैद्य, रामचंद्र बागडे, गुणवंत बांदरे, सुनिल मोहोड, अशोक कळंबे, सुभाष केवटे, परमानंद ढोणे, विठ्ठल बालपांडे, चेतन ठोंबरे, माधुरी बांदरे, कविता रेवतकर, नरेंद्र सौदागर आदी मान्यवर उपस्थित होते. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते नियुक्ती पत्रे देण्यातआली. माजी नगरसेवक संजय गुरमुळे यांनी घरवापसी केली. शेकडो युवा कार्यकर्त्यांनी भाजप प्रवेश घेतला. मोठ्या संख्येनी उपस्थित कार्यकर्त्यांच्या गर्दीनी सभागृह खचाखच भरले होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाजप अध्यक्ष राजेश क्षिरसागर यांनी केले. संचालन जिल्हा महामंत्री मनीष दुर्गे तर गौरव गुरमुळे यांनी आभार मानले. यशस्वीतेसाठी युवा मोर्चा अध्यक्ष सारंग दळवी, उमेश कळंबे, गोलू सोमकुवर, मंगेश ठाकरे, पराग रेवतकर, आशिष बागडे, सुरज झाडे, दिवाकर भंदिर्गे, पंकज ढोरे, रामदास मेटांगळे, तुषार वघाळे, पंकज पराते, शरद वैद्य, शुभम वानखेडे, विशाल वैद्य, मनीष अरखेल, गोपाळ चरडे, शुभम बोडखे, राजू गुजर, दीपक वाघे आदिंनी सहकार्य केले.

गौळ येथे श्रीसंत बाबाराव खराबे महाराज तेरावा पुण्यतिथी किर्तन सोहळा;तिन दिवशीय कार्यक्रमाचे आयोजन

गौळ ■ योगेश कांबळे



गौळ,(वार्ताहर) दिव्य तेज तपोनिधी श्री संत लोटांगण महाराजांच्या मुळ पायदळ वारीचे तिसरे उत्तराधिकारी निष्काम कर्मयोगी प्रेममुर्ती ह.भ.प. सद्गुरु श्री. बाबाराव (अण्णाजी) खराबे महाराज तेरावा पुण्यतिथी किर्तन सोहळा श्री क्षेत्र गौळ, येथे १६ जानेवारी रोजी प्रारंभ होत असून याची सांगता १८ जानेवारी रोजी होणार आहे. हा किर्तन सोहळा ह.भ.प. गुरुवर्य विजू महाराज महादेव संस्थान, वान्हा (पोटी) ह.भ.प. स्वामी अनंतानंद सरस्वती, गिता आश्रम, रत्नापुर ह.भ.प. गुरुवर्य तुळशिरामजी महाराज, मोहन महाराज संस्थान दाभा पहुर यांच्या प्रमुख उपस्थितीत साजरा होत आहे. येथील संत खराबे महाराज संस्थानात दिव्य तेज तपोनिधी श्री संत लोटांगण महाराजांच्या परंपरेचे तिसरे उत्तराधिकारी निष्काम कर्मयोगी प्रेममुर्ती ह.भ.प. सद्गुरु श्री. बाबाराव (अण्णाजी) खराबे महाराज यांच्या बारावा पुण्यतिथी उत्सव पौष शु. ६ रोज मंगळवार दि. १६/१/२०२४ ते पौष शु. ८ रोज गुरूवार दि, १८/१/२०२४ पर्यंत साजरा होत आहे. १८ जानेवारी रोजी या महोत्सवाची सागंता होत असून दैनंदिन धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. दैनंदिन पहाटे पाच ते सहा काकडा भजन दररोज सकाळी ७ ते ९ श्री विष्णू सहस्रनामस्त्रोत व श्री संत खटेश्वर चरित्र पारायण व्यासपीठ नेतृत्व ह.भ.प. तुळशीराम महाराज दाभा, दररोज सकाळी ९.३० ते ११.३० हरि किर्तन दुपारी ४ ते ५ नामजप दररोज सायंकाळी ५ ते ६ माऊली सांप्रदायिक हरिपाठ, राञी ६.३० ते ८.३० हरि किर्तन नंतर संगितमय भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

तिन दिवशीय कार्यक्रमात अनेक नामवंत किर्तनकाराचे किर्तन आयोजित करण्यात आले असून १६ जानेवारी रोजी सकाळी साडेनऊ ते साडेअकरा वाजता हनुमंत महाराज गाडगे मानकापुर यांचे किर्तन होणार असून राञी साडेसहा ते साडेआठ वाजता प्रकाश महाराज चंदनखेडे आळंदी यांचे किर्तन होणार आहे.तर १७ जानेवारी रोजी सकाळी साडेनऊ ते साडेअकरापर्यंत वाशीम येथील शेषेराव महाराज गायकवाड यांचे किर्तन आयोजित असुन राञी साडेसहा ते साडेआठ वाजता सायं येथील पंढरीनाथ महाराज सायतकर यांचे किर्तन होणार आहे.१८ जानेवारी रोजी सकाळी साडेनऊ ते साडे अकरापर्यंत रवींद्र महाराज विलायतकर (आळंदीकर) यांचे काल्याचे किर्तन होणार असून त्यानंतर दहीहंडी मिरवणूक होवून महाप्रसादाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.या कार्यक्रमाचा परिसरातील नागरिकांनी लाभ घेण्याचे आवाहन संस्थानाच्या वतिने करण्यात आले आहे.

संजय गांधी विद्यालयात स्वामी विवेकानंद जयंती साजरी



समुद्रपूर ■ अमोल झाडे

समुद्रपुरः दि. १२ जानेवारी २०२४ रोजी मा.श्री. सतीशजी वखरे, वरिष्ठ पत्रकार, कवी व लेखक हिंगणघाट यांनी 'स्वामी विवेकानंदांना अभिप्रेत आजच्या युवकांची कर्तव्ये' या विषयावर गुंफले. याप्रसंगी श्री.सतीशजी वखरे यांनी स्वामी विवेकानंदांच्या जीवनावर आधारित छोट्या छोट्या कथांमधून विद्यार्थ्यांना मोलाचा संदेश दिला. व आजच्या युवकांची स्वामी विवेकानंदांना अभिप्रेत असलेली नेमकी कर्तव्य कोणती याबाबत मार्गदर्शन केले. तसेच राजमाता जिजाऊ यांनी शिवबाला कसे घडवले याबाबतही विद्यार्थ्यांना समायोचित मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी रुग्ण मित्र व सामाजिक कार्यकर्ते गजूभाऊ कुबडे उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणात श्री.गजू भाऊ कुबडे यांनी युवकांनी रुग्णसेवेचा वसा घ्यावा आणि आपल्या नातेवाईकांना, गोरगरिबांना, दीनदुबळ्यांना शक्य ती मदत करावी असा मोलाचा संदेश दिला.

शाळेचे प्राचार्य श्री.मिलिंद मुळे यांनी युवक दिनानिमित्त स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांना वंदन करून व्याख्यानमालेची प्रस्तावना व उद्देश विशद केला. कार्यक्रमाचे संचलन श्री.एच.आर. डंभारे यांनी केले. तर आभार श्री. के.जी.वांदिले यांनी मानले.

अतिशय उत्साहात विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पाडून 'स्वर्गीय दादासाहेब कोल्हे व्याख्यानमाला' पार पडली.या व्याख्यानमालेसाठी फलक लेखनाचे काम प्रा. श्री.रवी आसुटकर, ध्वनी संयोजनाचे काम श्री.एम.व्ही.जवादे व श्री.के.डी.तडस यांनी केले. तर बैठक व्यवस्था श्री.व्ही.झेड.शेंडे व श्री.एन.बी.बेले यांनी केली. श्री. सी.एम.डहाके व श्री.एन.डी.कोळसे यांनी देखील या कार्यक्रमासाठी सहकार्य केले.

सशक्त व समर्थ युवा पिढी हीच देशाची खरी संपत्ती - उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस





नागपूर ■ दिलीप येवले

नागपूर, दिलीप येवले-

देशाची खरी शक्ती युवा पिढी आहे . सशक्त व समर्थ युवा पिढी हीच देशाची खरी संपत्ती आहे. देश निर्मितीमध्ये युवा पिढीचा महत्त्वाचा वाटा असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. भोसला मिलिटरी स्कूलच्या कस्तुरचंद पार्क येथे झालेल्या वार्षिक महोत्सवाला उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांची उपस्थित होती. यावेळी ते बोलत होते.

शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर, एअर चीफ मार्शल व्ही. आर. चौधरी, भोसला मिलिटरी स्कूलचे अध्यक्ष शैलेश जोगळेकर, कर्नल अमरेंद्र हरदास (निवृत्त), पोलीस आयुक्त अमितेश कुमार, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर आदी यावेळी उपस्थित आहेत.पहिल्या दिवसापासून भोसला मिलिटरी स्कूलशी नाते आहे. या स्कूलला वेगाने विकसित होताना जवळून पाहिले आहे. या स्कूलची देदीप्यमान प्रगती वाखानण्याजोगी आहे. संस्थापक बी. एस. मुंजे यांनी देशभक्त युवा पिढी तयार व्हावी यासाठी या स्कूलची निर्मिती केली असल्याचे उपमुख्यमंत्री म्हणाले.

गेल्या काही वर्षात देशाने वेगाने प्रगती केली आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात नवभारताचे सृजन पाहिले जात आहे व ते पूर्णत्वास येत आहे. यात युवा पिढीची महत्त्वाची भूमिका आहे. देशाचे सैन्यदल आत्मनिर्भर होत असून पुर्वी शस्त्रास्त्रे आयात केली जायची. आता मात्र मोठ्या प्रमाणात देशाची निर्यात वाढली आहे. मुलींसाठी स्वतंत्र मिलिटरी स्कूलची निर्मिती करण्याचा संस्थेचा मानस कौतुकास्पद असल्याचे उपमुख्यमंत्री म्हणाले. तत्पूर्वी, एआरओ मॉडेलिंग, विविध जिमनॅस्टिक प्रकार, घोडेस्वारी यांचे सादरीकरण विद्यार्थ्यामार्फत उपस्थितांसमोर करण्यात आले.भोसला मिलिटरी स्कूलचे संस्थापक बी. एस. मुंजे यांच्या जीवनावर आधारित धनश्री हरदास यांनी भाषांतरित केलेल्या इंग्रजी पुस्तकाचे प्रकाशन यावेळी करण्यात आले. स्कूलचे अध्यक्ष शैलेश जोगळेकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.

भोसला मिलिटरी स्कूलच्या वार्षिक महोत्सवाला उपस्थिती

स्मार्टफोनच्या माध्यमातून स्पर्धा परीक्षांची तयारी करावी: ठाणेदार संदिप गाडे :मोहगांव येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली नागदिवाळी: गावात काढण्यात आली भव्य शोभायात्रा

समुद्रपूर ■ अमोल झाडे



समुद्रपुर :आपण जर कष्ट केले तर तुमच्या आड कधीही गरीबी येत नाही फक्त आपल्यात मेहनत चिकाटी असने गरजेचे असते आज आपण साधनांचा उपयोग करून, गरिबीवर मात करुन पुढे जाऊ शकतो असे मत गिरड पोलीस ठाण्याचे ठाणेदार संदिप गाडे यांनी मोहगांव येथे माना आदिवासी जमात शाखेच्या वतीने दोन दिवसीय नागदिवाळी महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी व्यक्त केले.मोहगांव येथे माना आदिवासी जमात शाखेच्या वतीने दोन दिवसीय नागदिवाळी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.यावेळी गावात भव्य दिंडी शोभायात्रा काढण्यात आली यावेळी गावकऱ्यांनी या दिंडी शोभायात्रेचे मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले यावेळी या दिंडी शोभायात्रेचा समारोप कार्यक्रमस्थळी गावातील जिल्हा परिषद शाळेच्या करण्यात आली यावेळी या. महोत्सवाचे उद्घाटन गिरड पोलीस ठाण्याचे नवनियुक्त ठाणेदार संदिप गाडे, अध्यक्षस्थानी संजय दोडके, मार्गदर्शन म्हणून महाराष्ट्राचे अध्यक्ष सुभाष ननावरे,मोहगांव ग्रामपंचायतीचे सरपंच विलास नवघरे, वनरक्षक विजत दिघोळे,गिरडचे माजी पोलिस पाटील इंद्रपालजी आटे,पोलिस पाटील मेघाताई धोटे, ग्रामसेक पुरकाम साहेब, पुंडलिक ननावरे,मुख्याध्यापक रमेश वाघमारे,रमेश चौके, सुभाष ननावरे अंकुश मांडवकर, जगदीश महातळे संदिप दातारकर, आशा सेविका अर्चनाताई ओरके अंगणवाडी सेविका छायाताई हाडके आदी प्रामुख्याने उपस्थित होते.यावेळी उपस्तिथ पाहुण्यांचे हस्ते छत्रपती शिवाजी महाराज, डॉ बाबासाहेब आंबेडकर, सावित्रीबाई फुले, मानिका देवी,बिरसामुंडा, यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली यावेळी आयोजकांच्या वतीने उपस्तितीत मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.यावेळी मार्गदर्शक सुभाष ननावरे यांनी माना समाज काय आहे त्याच्या काय व्यथा आहे.याबात मार्गदर्शन करताना म्हणाले की आज मोहगांव येथे पहिल्यांदाच नागदिवाळी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून हा एक धार्मिक कार्यक्रम नुसन एक समाजाला विकासाकडे वाटचाल करण्याची प्रेरणा देणारा व्यासपीठ आहे.याठीकानावरून आपण आदर्श मानुस बनुन आपल गाव आपला समाज आदर्श करावे असे आवाहन केले.यावेळी गिरड पोलीस ठाण्याचे ठाणेदार संदिप गाडे उपस्तिथीतांना मार्गदर्शन करताना म्हणाले की मानुसला आपल्या कष्टाने महनेत करुन एक नावलौकिक मिळवून द्यावे.म्हणजे स्मार्टफोनचा उपयोग स्वताला गावाला स्मार्ट करण्यासाठी केला तर विद्यार्थ्यांनी स्मार्टफोनच्या माध्यमातून स्पर्धा परीक्षांची तयारी करून एक आदर्श नागरिक व्हावे असे आवाहन त्यांनी केले यावेळी उपस्थित मान्यवरांनी सुध्दा मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला येशस्वी करण्यासाठी, विकास घरत, प्रमोद घरत, विलास घरत,बंडूजी दोडके, विलास चौधरी,प्रमोद घरत, रामचंद्र नारनवरे, अरुण चौधरी,शंकर नारनवरे,चंदन नारनवरे, विलास घरत, स्वप्नील चौधरी, चंद्रशेखर डडमल, नंदकिशोर दोडके, राकेश दोडके, सौरभ रंदये, निखिल रंदये, सुधिर चौधरी, श्रीकृष्ण चौधरी, रामभाऊ चौधरी, हरिदास नारनवरे आदिंसह गावातील नागरिक सहकार्य केले.

विज्ञाननिष्ठ अनिता पाटील यांना राज्यस्तरीय पुरस्कार



कोराडी ■ दिलीप येवले

श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित विद्यामंदिर हायस्कुल व कनिष्ठ महाविद्यालय कोराडी येथील विज्ञान शिक्षिका अनिता पाटील यांना अग्निपंख शैक्षणिक समूह महाराष्ट्र राज्य यांच्या तर्फे दिला जाणारा राज्यस्तरीय नवोपक्रमशिल शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला. माहूर जिल्हा नांदेड येथे आयोजित एका समारंभात यवतमाळ जिल्ह्याचे माजी प्राथमिक शिक्षणाधिकारी प्रमोद सूर्यवंशी, डायटचे प्राचार्य डॉ. प्रशांत गावंडे, सामाजिक कार्यकर्त्यां मंजुषा ठाकरे, गटशिक्षणाधिकारी माहूर राजू मुधोळकर, प्राध्यापक माया मुळे, राज्य संघटक अर्चना मेहरे, राज्य समन्वयक गजानन गोपेवाड यांची प्रमुख उपस्थिती होती. अनिता पाटील यांनी आपल्या सेवाकाळात राबविलेल्या विज्ञान एक आनंददायी शिक्षण, कृति करा व शिका, अनिसला विज्ञानाची जोड, विज्ञानप्रदर्शनी एक अध्ययन अनुभव, विज्ञान मेळावा देईल खरे शिक्षण, मानसिक आरोग्याला आनापान साधनेची जोड, हरितसेना देईल परिसरातून अभ्यास अश्या विविध शैक्षणिक व सामाजिक उपक्रमाची दाखल घेऊन या पुरस्कारासाठी त्याची निवड करण्यात आली.त्यांच्या यशाबद्दल गटशिक्षणाधिकारी संगीता तभाने, केंद्र प्रमुख वैरागडे, नगराध्यक्ष राजेश रंगारी, अनिस जिल्हा कार्याध्यक्ष गौरव आळणे, शाळेचे मुख्याध्यापक शैलेश भस्मे, पर्यवेक्षक सोळंकी, शिक्षक शिक्षकेत्तर यांनी अभिनंदन केले.

बुलंद आवाज ग्रृप मांडगाव तर्फे दरवर्षी प्रमाणे याही वर्षी ३० रक्तदात्यांनी केले रक्तदान

समुद्रपूर ■ अमोल झाडे



समुद्रपुरः तालुक्यातील मांडगाव येथे दरवर्षी प्रमाणे याही वर्ष ०६ वे श्री संत बऱ्हाणपुरे महाराज प्रगट दिनानिमित्त बुलंद आवाज ग्रृप द्वारा आयोजित भव्य रक्तदान शिबीर घेण्यात आले होते.

या शिबीराची सुरूवात श्री संत बऱ्हाणपुरे महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले. यावेळी उपस्थित माजी. पं. स. सदस्य सुनीलभाऊ डुकरे, गणेशभाऊ तडस पोलीस पाटील, प्रमोदभाऊ डफ, सुनिलभाऊ पाहुणे,अंकीत दांडेकर, पंकज विहीरकर, नितीन तडस, विक्रम पिसे, मंगेश खापरे, लिलाधर खोले, आशिष घुसे, राहुल तडस, गिरीश पिंपळकर, दिपक घुसे, अक्षय दांडेकर, रोशन तडस, अनिकेत ढवळे, उपस्थित होते.

या शिबीरामध्ये ३० रक्तदात्यांनी रक्तदान केले. यामध्ये अकिंत दांडेकर, विक्रम पिसे, सुनीलभाऊ डुकरे, नितेश विहीरकर, पत्रकार दिगांबरभाऊ तडस, कुणाल वेदी, लिलाधर खोल्ले, अभीजीत दांडेकर, अक्षय प्र. दांडेकर,शुभम भोंगाडे,अनिकेत उगे, सुनील निकोडे, उद्देश ढवळे, श्रावण भगत, चेतन वडुले, गोविंदा वंजारी, शितलताई पाहुणे, विक्की घुसे, प्रज्वल बुकने, सचिनभाऊ तडस, योगेशभाऊ डफ, आदश ? राजपुत, हरिचंद्र कालवले, चेतन नागोसे, अविनाश वाघमारे, अजिंक्य झाडे, आकाश पिसे, राजु लेंगुरे, संकेत झाडे, राजुभाऊ मेंढे, विक्की डांगरी, सर्व रक्तदात्यांनी रक्तदान केले. व शिबीर यशस्वी केले. या शिबीरामध्ये कस्तुबा ? रूग्णालय येथील संपूर्ण टिम उपस्थित होती.

तसेच शिबीर यशस्वी करण्यासाठी बुलंद आवाज ग्रृप च्या सर्व पदाधिकारी परीश्रम घेतले.

विद्यार्थ्यांनी दूरदृष्टी ठेवून स्पर्धा परीक्षांचा विचार करावा - डॉ. वकील शेख



कोराडी ■ दिलीप येवले

आजचे युग हे स्पर्धात्मक झाले आहे, बेकारी मोठ्या प्रमाणात वाढली आहे अशा परिस्थितीत आपल्याला टिकाव धरायचा असेल तर स्पर्धा परिक्षेत यश संपादन करणे गरजेचे आहे. म्हणून विद्यार्थ्यांनी दूरदृष्टी ठेवून स्पर्धा परीक्षांचा विचार करावा. असे विचार डॉ. वकील शेख यांनी व्यक्त केले.

सच्चिदानंद शिक्षण संस्था नागपूर द्वारा संचालित तायवडे महाविद्यालय महादूला- कोराडी येथे इतिहास विभागाच्या वतीने 'स्पर्धा परीक्षेतील इतिहास विषयाचे महत्त्व' या विषयावर दोन दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेला प्रमुख मार्गदर्शक म्हणुन डॉ. सतीश शिंदे लातूर यांनी मार्गदर्शन केले . त्यांनी स्पर्धा परीक्षांमध्ये इतिहास हा विषय महत्त्वाचा असून आजपर्यंत स्पर्धा परीक्षेत जे काही इतिहासाचे प्रश्न विचारण्यात आले. ते संपूर्ण विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. या कार्यशाळेच्या समारोपाप्रसंगी अध्यक्षस्थानी डॉ. वकील शेख राज्यशास्त्र विभागप्रमुख तायवाडे महाविद्यालय महादुला-कोराडी हे होते. त्यांनी आपल्या अध्यक्षिय भाषणातून वेगवेगळया उदाहरणावरून विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेचे महत्व पटवून दिले. यावेळी मंचावर इतिहास विभाग प्रमुख डॉ. शरद डवरे, डॉ.चव्हाण तसेच फिनिक्स कॅरिअर अकॅडमीचे प्रदीप कमाले उपस्थित होते. या कार्यक्रमाचे संचालन प्रदीप कमाले यांनी केले व आभार प्रदर्शन डॉ. विष्णू चव्हाण यांनी मानले. या कार्यक्रमाला २३० विद्यार्थी तसेच महाविद्यालयातील प्राध्यापकवर्ग उपस्थित होते.

नॅशनल सिक्युरिटी एजन्सी दिल्लीने हॅपी टेल्स ग्रुपचा गौरव केला



समुद्रपूर ■ अमोल झाडे

तालुका प्रतिनिधी अमोल झाडे समुद्रपूर

समुद्रपूर : हॅपी टेल्स ग्रुपला राष्ट्रीय सुरक्षा एजन्सी, दिल्ली द्वारे उत्कृष्ट कामगिरी सत्कार समारंभ २०२४ प्रदान करण्यात आला. वीर वॉरियर्स ग्रुप हिंगणघाटच्या वतीने आयोजित सत्कार समारंभात हॅपी टेल्स ऑफ समुद्रपूरचा गौरव करण्यात आला.यावेळी हॅपी टेल्सच्या संस्थापक दर्शना वीरेंद्र सिसोदिया उपस्थित होत्या. यावेळी दर्शना सिसोदिया यांनी ग्रुपबद्दल माहिती दिली, हा ग्रुप दर आठवड्याला हिंगणघाट समुद्रपूर शहरातील २०० ते ३०० राजहंसांना खाऊ घालतो, आजारी हंसांवर उपचार करतो आणि ज्या राजहंसांवर उपचार करणे येथे शक्य नाही त्यांना रुग्णवाहिकेद्वारे नागपूरच्या दवाखान्यात पाठवले जाते. हंस, मेंढ्या, शेळया आणि माकडांची काळजी घेते. या गटातील सर्व महाविद्यालयीन मुलांना स्थानिक शाळा आणि महाविद्यालयात जाऊन जीवांची सेवा करण्यासाठी प्रोत्साहित केले जाते.या कार्यक्रमाचे आयोजन श्री रोहित जी राऊत यांनी केले होते. उद्घाटन श्री समीर भाऊ कुणावर (आमदार), कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री.भूपेंद्र जी शहाणे (प्रशासक पी.व्ही. टेक्सटाईल जाम), प्रमुख पाहुणे मा.सुरेश जी वाघमारे (माझ खास वर्धा लोकसभा) उपस्थित होते.कार्यक्रमाचे संचालन राकेश जी यांनी केले. शर्मा. यावेळी रोहित पाखराणी, अथर्व सोलंकी, यश सिसोदिया यांच्यासह हॅपी टेल्स ग्रुपचे नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

'स्वतंत्र विदर्भ राज्य व काटोल जिल्हा निर्मितीसाठी २४ जानेवारी ला मध्यप्रदेश ची बॉर्डर रोखणार': विराआस

काटोल ■ प्रशांत पवार

विश्रामगृह, काटोल येथे पूर्व विदर्भ विभाग अध्यक्ष अरुण केदार यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. विराआस ने स्वतंत्र विदर्भ राज्याच्या निर्मिती करता 'करू- मरू किंवा जेल मध्ये सडू' असा निर्धार व्यक्त केला असून, घटनेच्या कलम ३ प्रमाणे केंद्र सरकारला राज्य देण्याकरता बाध्य करण्यासाठी, केंद्र सरकारचे ३१ जानेवारी पासून सुरु होत असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात स्वतंत्र विदर्भ राज्याच्या मागणीकरीता सातत्याने आंदोलनाचा रेटा लावणारा दबाव गट म्हणून केंद्र सरकारने निर्णय घ्यावा याकरिता २४ जानेवारी २०२४ ला नागपूर जिल्हा महासचिव प्रदीप उबाळे पाटील यांच्या नेतृत्वात मध्यप्रदेश सीमेवरील सावरगांव बडचिंचोली रस्त्यावर दुपारी १२ वाजता 'रस्ता रोको आंदोलन' करण्यात येणार आहे. या आंदोलनात विदर्भाचे नेते ?ड. वामनराव चटप सामील होणार असून, रस्ता रोको आंदोलनाच्या माध्यमातून स्वतंत्र विदर्भ राज्य व काटोल जिल्हा निर्माण करावे, वीज दरवाढ राज्य सरकारने तात्काळ मागे घ्यावी व शेतीपंपाला दिवसाचे लोडशेडींग बंद करावे, अन्नधान्यावरील जी. एस. टी तात्काळ रद्द करावा, कापसाला १५ हजार रुपये प्रति क्विंटल भाव देण्यात यावा, संत्र्याला ५० हजार रुपये प्रति हेक्टर मोबदला देण्यात यावा, सोयाबीन ला १२ हजार रुपये प्रति क्विंटल भाव देण्यात यावा, अतिरुष्टी व पीकविमा धारकांना तात्काळ मोबदला देण्यात यावा, ही मागणी करण्यात येणार आहे.

विदर्भ राज्य आंदोलन समिती काटोल तालुक्याची बैठक संपन्न



काटोल तालुक्याच्या बैठकीला पूर्व विदर्भ अध्यक्ष अरुण केदार, नागपूर जिल्हा महासचिव प्रदीप उबाळे पाटील, युवा आघाडी अध्यक्ष मुकेश मासुरकर, नागपूर जिल्हा उपाध्यक्ष गुलाबराव धांडे, काटोल विधानसभा अध्यक्ष बाबाराव वाघमारे, शहर अध्यक्ष वीरेंद्र इंगळे, तालुका अध्यक्ष दिलीप सुतोने, उपाध्यक्ष प्रवीण राऊत, धीरज मांदळे, नागपूर जिल्हा युवा टायगर फोर्स अध्यक्ष पराग वैरागडे,मनोहर करोती, सुभाष नरोलिया, कृष्णा डफरे, सागर दुधाने, देविदास घायवट, अरुण परबत, धनश्री तिजारे, वसंतराव वैद्य, रामचंद्र बहुरूपी, डबरासे, जयसिंह गहलोद, चेतन उमाठे, देवेंद्र रोकडे रामराव पाटील, पुष्पा सावरकर, संगीता शेंडे,प्रीती देशभ्रतार, वनिताजी पाटील, डॉ सुधाकर कावळे,वीरेंद्र पवार, चेतन उमाठे,सुरेंद्र नासरे, उत्तम हनवटे, गणेश वरठी, नबी पठाण, वीणा वरगट, अनिता वासनिक, पुखराज रेवतकर, प्रभाकर नांदेकर, जनार्धन भिसे, मंगेश राऊत, पांडुरंग पोटे,उमाबाई शेंडे, प्रकाश डोंगरे सह शेकडो विदर्भवादी उपस्थित होते.

महाराष्ट कामगार कल्याण मंडळ, अंतर्गत कामगार कल्याण केंद्र मौदा येथे क्रिकेट स्पर्धेचे आयोजन



नागपूर ■ दिलीप येवले

महाराष्ट कामगार कल्याण मंडळ, गट कार्यालय-२ विनोबाग्राम अंतर्गत कामगार कल्याण केंद्र मौदा येथे प्रशासकिय गतिमानता कार्यक्रमांतर्गत वैशिष्टयपुर्ण कार्यक्रम गोपाल स्नॅक्स प्रा.लि. या आस्थापनामध्ये दि.०९.०१.२०२४ रोजि क्रिकेट स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटनप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष युनिट हेड, गोपाल स्नॅक्स प्रा. लि, मौदा विरेंद्र सर विशेष उपस्थीती नंदलाल राठोड सहा.कल्याण आयुक्त, वि. का. नागपूर नंदलाल राठोड, सहा. लेखा अधिकारी व निधि निरीक्षक राजेश पाठराबे, कामगार कल्याण अधिकारी छोटु जाधव हे उपस्थीत होते. सहा. कल्याण आयुक्त नंदलाल राठोड यांनी आपल्या भाषणामध्ये मंडळाच्या विविध कल्याणकारी योजना, उपक्रम, व कार्यक्रमा या विषयी माहिती दिली व कामगार व कामगार कुटुंबियांचा सर्वांगिण विकास साधण्याठी व त्यांचे जिवनमान उंच्चवण्याठी मंडळ सदैव प्रर्यत्न करीत असतात असे आपल्या भाषणात सांगितले, तसेच कार्यक्रमाचे सुत्र संचालन सुरभी लोहकरे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रकाश पांडे यांनी केले. सदरील कार्याक्रमाच्या यशस्वीसाठी केंद्र महिला कल्याण सहा. रंजना सदाफळे, जितेंद्र निमजे, तसेच कंपनी कर्मचारी यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे उद्घाटन सहा.कल्याण आयुक्त, वि. का. नागपूर नंदलाल राठोड यांनी रिबीन कापुण केले. उत्सवात व आंनदमय वातावरणात स्पर्धेला सुरुवात करण्यात आली.

पोटा येथे अक्षद कलश यात्रा



खापरखेडा ■ दिलीप येवले

श्रीराम जन्मभूमी अयोध्या येथून आलेल्या पुज्यनिय अक्षद कलश दिंडी यात्रा पोटा गावामध्ये मोठ्या उत्साह मध्ये काढण्यात आली यावेळी गावातील महिला, नागरिकांनी अक्षद कलश यात्रेचे स्वागत केले. याप्रसंगी दिपक सातपुते, योगेश जालंदर, बाळासाहेब काकड, रमेश भड, शंकर काकडे, शातांराम खापरे, भुजंग भड, दिनेश भड, येशुकांत काकडे, छत्रपाल भड, अरुण काकडे, रोशन वानखेडे, विजय दोड, राजेश काकडे, विजय भड, सुनील ढोले, ब्रिजेश भड, निखिल भड, अभिषेक भड, अंकुश लकडकर, कुणाल भड, अंकूश दोड, कोंतय काकडे, मयूर भड, अक्षय गोमकाळे, प्रेमदास शेळके, वंश काकडे, दर्पण भड, अमन ढोले व गावातील सर्व महिला मंडळी, समस्त रामभक्त ग्रामवासी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

डॉ. महिबूब सय्यद राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेश सरचिटणीस पदी निवड



नागपूर ■ दिलीप येवले

पुण्यातील मोशी येथे आयोजित कार्यकर्त्या मेळाव्यात डॉ. महबूब सय्यद यांनी एनसीपी पक्षात प्रवेश केला. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते त्यांना महाराष्ट्र राज्य रोजगार व स्वयंरोजगार सेलच्या महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस म्हणून नियुक्त करण्यात आले. यावेळी एनसीपीचे पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष अजित गव्हाने, भोसरी विधानसभेच माझी आमदार विलास लांडे, माजी राज्यमंत्री ज्ञानेश्वर कांबळे, महाराष्ट्र राज्य महिला महामंडळाच्या अध्याश रुपालीताई चाकणकर, माजी महापौर योगेश बहल, स्वयंरोजगार सेलच्या अध्यक्षा मेघा पवार, टीएसपीएल ग्रुपचे संचालक देशभूषण दुड्डू जैन आणि पुणे जिल्हाध्यक्षा कविता अलहत आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमात बोलताना डॉ. सय्यद यांनी प्रत्येक जिल्ह्यात रोजगार उपलब्ध करून देण्याचा निर्धार व्यक्त केला. ते म्हणाले, 'महाराष्ट्रात बेरोजगारीची समस्या गंभीर आहे.

या समस्येवर मात करण्यासाठी मी माझी सर्व शक्ती खर्च करेन. प्रत्येक जिल्ह्यात रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी मी प्रयत्न करेन. 'डॉ. महिबूब सय्यद यांना महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेरही रोजगार, स्वयंविकास, कौशल्य प्रदान करण्याचा १५ वर्षांहून अधिक वर्षांचा अनुभव आहे. त्यांनी अनेक सामाजिक व राजकीय चळवळीत भाग घेतला आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली एनसीपी रोजगाराच्या क्षेत्रात नवीन क्रांती घडवून आणू शकते, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

स्वच्छ्ता अभियान राबविण्याचे जिल्हा प्रशासनाचे निर्देश

काटोल ■ प्रशांत पवार



जिल्हाधिकारी , व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आज व्हिडिओ कॉन्फरन्स मधे दिलेल्या सूचनेनुसार तीर्थक्षेत्र,मंदिर,गुरुद्वारा,विहार,दग र्ा व इतर सार्वजनिक संस्थान ची स्वच्छ करणे,साफ सफाई करणे,रंग रांगोटी करणे,परिसर स्वच्छ करणे,बाबत सभा घेण्यात आली,सभेला तीर्थ क्षेत्र संस्थान चे सचिव,ट्रस्टी व सर्व सचिव हजर होते, व अभियान प्रभावीपणे राबविणे बाबत सांगोपांग चर्चा करण्यात आली व काम तत्काळ सुरू करणे बाबत सूचना देण्यात आल्या

तसेच इश नेर्प्र्रे योजना अंतर्गत नोंदणी करणे,ण्एण केन्द्र वरून लाभार्थी नी अर्ज करणे, व योजनाची माहिती देण्यात आली.कार्यशाळेला सर्व ग्रामपंचायत चे सचिव हजर होते.तसेच कार्यशाळेला सभापती श्री संजय डांगोरे , तहसीलदार राजू रणवीर,नगर परिषद चे प्रतिनिधी , ँ पस काटोल,पंचायत अधिकारी,एँश चे म्ि,ँ ँ,सर्व सचिव हजर होते. माननीय तहसीलदार,गट विकास अधिकारी,सभापती यांनी उपस्थित सोबत चर्चा करून मार्गदर्शन केले

संबधित सर्व सचिव ना निर्देशित करण्यात येत आहे की,उद्यापासून स्वचता मोहीम यशस्वी व प्रभावीपणे राबवून फोटो व्हिडिओ ग्रुप वर टाकावे,उपस्थितांची नावे पदनाम , व अभियान मध्ये कोणत्या बाबी समाविष्ट होत्या ,किती लोकांनी श्रमदान केले,त्यामध्ये बचत गट स्वच्छ सखी ,बचत गट महिला सदस्य,शाळा कॉलेज मधील मुले मुली,एनएसएस, स्पोर्ट क्लब,भजन मंडळ इत्यादी ,तीर्थक्षेत्र ट्रस्टी, चा सहभाग असावा ते नमूद करावे , ,फेसबुक युट्यूब चाईनल व्हिडिओ क्लिप तयार करावी व तसा अहवाल दररोज नियमित पाठवावा असे सांगण्यात आले.

विस्तार अधिकारी पंचायत, व एँश चे म्ि राजू व अंगद यांना या कामासाठी नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे दररोज मागोवा घ्या व नियोजन करून अहवाल रोज सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

सर्व सचिव नी नोंद घ्यावी, गावामधील सुद्धा परिसर स्वच्छ तसा ,ऑफिस स्वच्छ्ता, गटारे नाल्या साफ करणे,वृषारोपण करणे,माझी वसुंधरा नुसार नियोजन करणे, व प्रतेक वॉर्ड निहाय स्वच्छ्ता टीम तयार करून त्यामध्ये स्वच्छ्ता सखी ,बचत गट,सदस्य,ग्राम पंचायत चे आजी माजी सर्व पदाधिकारी,जिल्हा परिषद पस पदाधिकारी याना निमंत्रण देऊन सहभाग नोंदविणे, टी शर्ट टोपी तयार करणे ,ढोल ताशांच्या गजरात कार्यक्रम करणे ,बॅनर पोस्टर लावणे इत्यादी आवश्यक बाबी पूर्ण करून घ्यावे,तलाठी कृषी सहायक, शिक्षक यांचीसुधा मदत घेण्याचा सूचना प्रशासनातर्फे देण्यात आल्या.

क्रीडा मंडळातर्फे राष्ट्रीय युवा दिन युवा सप्ताहाचे आयोजन

नागपूर ■ दिलीप येवले



राष्ट्रीय युवा दिन युवा सप्ताहाचे सन २०२३-२४ चे आयोजन महाराष्ट्र शासनाच्या कीड्रा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य, पूणे यांचे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी, कार्यालय नागपूर द्वारा सन २०२३-२४ या सत्रातील स्वामी विवेकानंद यांची जयंती व राष्ट्रीय युवा दिन युवा सप्ताह तसेच राजमाता जिजाऊ यांची जयंती सेंट उर्सुला गर्ल्स स्कूल नागपूर या ठिकाणी आयोजित करण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष सेंट उर्सुला गर्ल्स स्कूल नागपूर मुख्याध्यापिका रचना सिंग, कार्यक्रमाचे उदघाटक धनवटे नॅशनल कॉलेजचा डॉ. प्रा. पदमिनी दुरुगकर (घोसेकर), प्रमुख अतिथी राज्य युवा पुरस्कारप्राप्त गौरव दलाल, तालुका क्रीडा अधिकारी राजेन्द्र साप्ते, राज्य क्रीडा मागर्दर्शक तथा जिजामाता पुरस्कारार्थी डॉ. दर्शना पंडीत, क्रीडा अधिकारी अनिल बोरवार, क्रीडा अधिकारी माया दुबळे, क्रीडा अधिकारी विशाल उपमुख्याध्यापक, शारिरिक शिक्षक सुज्ञान खाडे शाळेतील सर्व शिक्षक वृंद यांच्या उपस्थितीत सप्ताहाचे उद्घाटन करण्यात आले. रचना सिंग यांनी आपल्या मनोगत व्यक्त करतांना उपस्थित विद्यार्थीनां जिवनामध्ये शारिरिक मानसीक आरोग्य सुदृढ ठेवणे व स्वामी विवेकानंद यांनी दिलेली शिकवण आचरणात आणुन आपले व्यक्तिमत्व विकसीत करावे असे मनोगत व्यक्त केले. डॉ. प्रा. पदमिनी दुरुगकर (घोसेकर), गौरव दलाल यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना असे म्हटले की, प्रत्येकानी आपले लक्ष निर्धारित करणे गरजेचे आहे. ज्याप्रमाणे स्वामी विवेकानंद, माँ जिजाऊनी जी शिकवण दिली त्याचे आदर्श समोर ठेवुन आपले आयुष्य सार्थकी करण्याकरीता सकारात्मकत प्रयत्न करावे असे मनोगत व्यक्त केले या कार्याक्रमाचे प्रास्ताविक तालुका क्रीडा अधिकारी हिंगणा राजेन्द्र साप्ते म्हणाले की, कुठल्याही क्षेत्रामध्ये निरंतर प्रयत्न हे यशाचे गमक असते असे मत व्यक्त केले दि. १२ त १९ जानेवारी पर्यत विविध शाळा महाविद्यालयामध्ये निंबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, पर्यावरण मार्गदर्शन, यशस्वी व्यक्तीचे कथन इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार सुज्ञान खाडे यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन क्रीडा अधिकारी माया दुबळे यांनी केले.

जनप्रभात हे दैनिक पत्र मालक, प्रकाशक,मुद्रक : संपादक राहुल ज्ञानेश्वरराव गजरे यांनी रुतुजा प्रिंटर,नवीन आष्टी ता.आष्टी जि.वर्धा ४४२२०२ येथे मुद्रीत करुन साप्ताहिक जनप्रभात कार्यालय,नवीन आष्टी ता.आष्टी जि.वर्धा ४४२२०२ येथे प्रसिध्द केले. भ्रमणध्वनी ७८७५६१३६१९ (या पत्रकातील सर्व माहितीशी संपादक,मालक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद वर्धा न्यायालयांतर्गत) RNI NO : MAHMAR/2022/82242